बातम्या,
लेख व
जाहिरातीसाठी
लातूर
समाचार
समर्थनगर
धाराशिव

। धाराशिव । वर्ष २५ वे । अंक १७३ वा । बुधवार दिनांक १७ सप्टेंबर, २०२५ । पृष्ठे ६ । किंमत १.५० ₹

RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
(सांज दैनिक) पोष्ट परवाना
L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

प्रियंका
ढाबा हॉटेल
गड पाटी जवळ
धाराशिव.
रूचकरभोजनासाठी
भेट द्या

## क्राईम न्युज

### प्राण्यांना निर्दयपणे वागणुक देवून वाहतुक करणाऱ्यावर गुन्हा दाखल

परंडा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत अतुल रा. साडे ता. करमाळा जि. सोलापूर, दिनेश रा. केम ता. करमाळा जि. धाराशिव यांनी दि.१५.०९.२०२५ रोजी परंडा ते बावची जाणारे रोडवर महात्मा गांधी शाळेजवळ रोडवर पिकअप क्र एमएच ०८ डब्ल्यु ५००८ मध्ये गोवंशीय जातीचे ३५ वासरे वाहनासह एकुण ४,७५,००० किंमतीचे गोवंशीय जातीचे वासरे हे क्षमतेपेक्षा जास्त दाटीवाटीने तोंड व पाय बांधून कोबुंन त्यांचे चारा पाण्याची व्यवस्था न करता निर्दयतेने कत्तलीसाठी बेकायदेशीर रित्या वाहतुक करताना परंडा पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे नमूद व्यक्तींविरुध्द प्राण्यास क्रुरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम कलम ११(१), ११(१)(ए), ११(१) (एफ), ११(१) (एच), ११ ( (ई) (ऐ) (आय) सह प्राणी संरक्षण अधिनियम ५(अ), ५(बी), ९ (ब),११ सह प्राण्याचे परिवहन अधिनियम कलम ४७, ५४, ५६ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### मोटरसायकलने दिलेल्या धडकेत गंभीर जखमी

बेंबळी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे महंमद महेबुब पठाण, वय ३४ वर्षे,रा. रजपुत झोपडपट्टी बेंबळी ता. जि. धाराशिव यांचा मुलगा महेबुब पठाण, वय ८ वर्षे हा दि.३०.०८.२०२५ रोजी सांयकाळी ०५.३० वा. सु. घरासमोर खेळत असताना मोटरसायकल चा चालक करीम अली शेख, रा. रजपुत झोपडपट्टी बेंबळी ता. जि. धाराशिव यांनी त्याचे ताब्यातील मोटरसायकल ही चालवून महेबुब पठाण यास धडक दिली. या अपघातात महेबुब पठाण हा गंभीर जखमी झाला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-महंमद पठाण यांनी दि.१५.०९.२०२५ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन बेंबळी पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

# आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी चिखल तुडवत केली नुकसानीची पाहणी

## मुसळधार पावसाचा कहर; गावोगावी जाऊन शेतकऱ्यांना दिलासा, अधिकाऱ्यांना बोलावून पंचनामे करण्याचे आदेश



धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- धाराशिव तालुक्यासह परिसरातील गावांना शनिवारी रात्री मुसळधार पावसाने झोडपले. त्यामुळे पिकांचे, अनेकांच्या घरांचे प्रचंड नुकसान झाले. काही गावांचा संपर्क तुटला. घरांत पाणी शिरल्यामुळे अनेक गावांत नागरिकांना रात्र जागून काढावी लागली. नागरिक, शेतकरी हवालदिल झाले. महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्स्फॉर्मेशनचे उपाध्यक्ष, आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी गावोगावी जाऊन नागरिक, शेतकऱ्यांना दिलासा दिला. अधिकाऱ्यांना घटनास्थलावर बोलावून घेऊन पंचनामे करण्याचे आदेश दिले. नुकसानभरपाई मिळवून देणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

रविवारी सकाळीच आमदार पाटील यांनी धाराशिव सोडले. जवळे (दु.). दुधगाव, ढोकी, तेर, पानवाडी, रामवाडी, भंडारवाडी, पाडोळी (आ.) आदी गावांना भेट दे नुकसान झालेल्या पिकांची पाहणी करत शेतकऱ्यांशी संवाद साधला. त्यांच्या अडचणी समजून घेतल्या. या पाहणीवेळी धाराशिवच्या तहसीलदार मृणाल जाधव याही उपस्थित राहिल्या. नुकसानीचे पंचनामे करण्यासाठी आमदार पाटील यांनी विविध विभागांच्या अधिकाऱ्यांना घटनास्थळावर बोलावून घेतले.

आमदार पाटील यांनी चिखल तुडवत नुकसान झालेल्या पिकांची पाहणी केली.

अनेकांच्या शेतातील बांध फुटल्यामुळे मोठ्या प्रमाणात माती वाहून गेली आहे. तेरणा धरण भरल्यामुळे दरवाजे उघडण्यात आले आणि ते पाणी शेतांमध्ये शिरले. दुधगाव- खामगाव रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली. आमदार पाटील यांनी शेतकऱ्यांसह तरुण, मुलांशीही संवाद साधून नुकसानीची माहिती घेतली. रविवारी सकाळी सुरू झालेला आमदार राणाजगजतिसिंह पाटील यांचा पाहणी दौरा सायंकाळी सहाच्या सुमारास संपला. पंचनामे करण्याचे, यातून कोणालाही न वगळण्याचे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले.

**उजनीला पाण्याचा वेढा अन् पाटील यांचा धोकादायक प्रवास...**

उजनीच्या (ता. औसा) बाजारपेठेला पुराच्या पाण्याने वेढले आहे. पाण्याच्या धोकादायक प्रवाहातून वाहनाची वाट काढत आमदार पाटील यांनी उजनीची बाजारपेठ गाठून व्यापारी, नागरिकांशी संवाद साधला. वेगाने वाहणाऱ्या या पाण्यातून त्यांचे वाहन पलीकडे जाईल की नाही, अशी शंका होती, मात्र उजनीत जाण्याची ठाम भूमिका आमदार पाटील यांची होती. त्यामुळे चालकाने धोकादायक पाण्यातून वाहन पलीकडे नेले.

# जिल्ह्यात १० दिवसीय महिला सक्षमीकरण जनजागृती अभियान यशस्वी




धाराशिव, (जिमाका): महिला आणि बालविकास विभागाच्या म-ाध्यमातून केंद्र शासनाच्या 'मिशन शक्ती' योजनेंतर्गत जिल्ह्यात २ ते १२ सप्टेंबरदरम्यान महिलांसाठी विशेष १० दिवसीय जनजागृती अभियान राबविण्यात आले.

या अभियानात शिबिरे,कार्यशाळा आणि सामूहिक कार्यक्रमांद्वारे महिलांच्या हक्कांबाबत व शासकीय योजनांबाबत महत्त्वाची माहिती समाजातील विविध घटकांपर्यंत पोहोचविण्यात आली.अभियानाचा मुख्य भर 'सखी वन स्टॉप सेंटर' आणि 'महिला सक्षमीकरण केंद्रा'च्या कार्याबाबत जनजागृती करण्यावर होता.

'सखी वन स्टॉप सेंटर'तर्फे कौटुंबिक हिंसाचार,लैंगिक अत्याचार, बालविवाह,छेडछाड,मानवी तस्करी आणि सिड हल्ल्यांवर बळी पडलेल्या महिलांना वैद्यकीय, कायदेशीर,समुपदेशन आणि तात्पुरत्या निवाऱ्याची सेवा २४ तास विनामूल्य दिली जाते.मागील अडीच वर्षांत या केंद्राने १३५१ हून अधिक महिलांना आधार दिला आहे.


'महिला सक्षमीकरण केंद्रा'मार्फत महिलांसाठीच्या विविध शासकीय योजना प्रभावीपणे गरजूंपर्यंत पोहोचवल्या जातात. तसेच 'महिला हेल्पलाइन - १८१' बद्दलही माहिती देण्यात आली.

या अभियानात 'बेटी बचाव बेटी पढाव', महिला सुरक्षा','महिला आरोग्य','लैंगिक संवेदनशीलता', 'पॉश अधिनियम', 'पीसीपीएनडीटी अधिनियम', कायदेविषयक जागरूकता आणि पोषण या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. महिला,विद्यार्थी,किशोरवयीन मुले, गरोदर माता व शासकीय अधिकारी-कर्मचारी अशा सर्व घटकांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.

हे अभियान यशस्वी करण्यासाठी प्रभारी जिल्हा महिला व बालविकास अधिकारी किशोर गोरे,जिल्हा संरक्षण अधिकारी भुजंग भोसले, ड.प्रियांका जाधव (सखी वन स्टॉप सेंटर प्रशासक) तसेच देवकन्या हिंगले,मनीषा जोगदंड,भाग्यश्री कोळी,दिपाली घोरपडे,सोहन पेठे आणि परमेश्वर गवाड यांनी विशेष परिश्रम घेतले.

या उपक्रमामुळे धाराशिव जिल्ह्यात महिलांच्या हक्कांबाबत आणि उपलब्ध शासकीय मदतीबाबत जनजागृतीला मोठी चालना मिळाली आहे.

# आत्महत्या केलेल्या कुंटुबाची बसवराज पाटील यांनी घेतली भेट



मुरूम (सुधीर पंचगल्ले) हैदराबाद गॅझेटनुसार बंजारा समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण मिळावे, या मागणीसाठी लढा देत असताना नाईक नगर (ता. उमरगा) येथील पवन गोपीचंद चव्हाण या युवकाने आत्महत्या करून आपले जीवन संपविले. या घटनेची माहिती मिळताच माजी मंत्री तथा भारतीय जनता पक्षाचे लातूर जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील यांनी तात्काळ त्यांच्या निवासस्थानी भेट देऊन कुटुंबीयांचे सांत्वन केले. यावेळी शरण पाटील फाउंडेशन तर्फे मयताच्या वारसांना तातडीची आर्थिक मदत सुद्धा करण्यात आली. तसेच, मुख्यमंत्री सहायता निधीतून शक्य तितकी जास्तीत जास्त मदत मिळवून देण्याचे आश्वासन कुटुंबीयांना दिले. या प्रसंगी विठ्ठल साई साखर कारखान्याचे संचालक माणिकराव राठोड, योगेश राठोड, पोलीस पाटील विठ्ठलराव पवार, रमेश पवार, खिरू राठोड, अरुणराव राठोड, अमृत चव्हाण, धनराज पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

# रामकृष्ण परमहंस महाविद्यालय, धाराशिव यांच्या वतीने निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन



धाराशिव (शीला उंबरे-पेंढारकर)- जागतिक पातळीवर २९ जुलै रोजी साजरा केला जाणारा आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिन रामकृष्ण परमहंस महाविद्यालय, धाराशिव येथील प्राणीशास्त्र विभाग यांच्या वतीने उत्साहात साजरा करण्यात आला. या दिनानिमित्त विद्यार्थ्यांमध्ये वाघ संवर्धनाबाबत जागरूकता निर्माण व्हावी यासाठी निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. निबंध स्पर्धे साठी विषय वाघाचे जैविक महत्त्व आणि संवर्धनाची गरजहा देण्यात आला होता.या स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील विविध वर्गांतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी वाघाच्या परिसंस्थेमधील भूमिकेपासून ते मानवी अतिक्रमण, शिकारीसारख्या समस्यांवर सखोल विचार व्यक्त केला. निबंधांची परीक्षणे विषयतज्ज्ञ प्राध्यापकांनी केली व उत्कृष्ट निबंधांसाठी पारितोषिके पायाळ शौर्य (बी.एससी भाग १ ) मधील विद्यार्थ्याला जाहीर करण्यात आली. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संदीप देशमुख यांचे मार्गदर्शन लाभले.

# नवरात्रोत्सव तयारी, येडेश्वरी देवी मंदिराची रंगरंगोटी अंतिम टप्प्यात; भाविकांना सर्व सोयी-सुविधा पुरवण्यासाठी देवस्थान ट्रस्टकडून तयारी



धाराशिव (प्रतिनिधी)- राज्यातील आराध्य दैवत, भाविकांचे श्रद्धास्थान श्री येडेश्वरी देवीच्या नवरात्र महोत्सवाची सोमवार, दि. २२ सप्टेंबरपासून घटस्थापनेने प्रारंभ होणार आहे. नवरात्र महोत्सवासाठी येणाऱ्या भाविकांची सर्व प्रकारच्या सोयी-सुविधा पुरवण्यासाठी मंदिर देवस्थान ट्रस्टकडून जय्यत तयारी केली असून, देवीच्या मंदिराच्या रंगरंगोटीचे काम अंतिम टप्प्यात आहे.

सोमवारी (दि. २२) अश्विन शुद्ध प्रतिपदेस रात्री आठ वाजता देवीची पंचोपचार महापूजा, महाआरतीने घटस्थापनेने श्री येडेश्वरी देवीच्या शारदीय नवरात्र महोत्सवास सुरुवात होणार आहे. तुळजाभवानीची धाकटी बहीण म्हणून श्री येडेश्वरी देवीची राज्यभर प्रसिद्धी असल्याने तुळजाभवानीचे दर्शन झाल्यानंतर प्रत्येक भाविक येडेश्वरी देवीच्या दर्शनासाठी येतो. नवसाला पावणारी देवी म्हणून जागृत श्री येडेश्वरी देवस्थान महाराष्ट्रासह परराज्यात प्रसिद्ध आहे.

नवरात्र काळात येणाऱ्या भाविकांसाठी सुलभ दर्शन व्हावे यासाठी मंदिर संस्थांकडून दर्शन रांगेची व्यवस्था, भाविकांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, खेटा मार्गावरील रस्त्याची स्वच्छता, खेटा मार्गावर प्रकाशासाठी पथदिवे व्यवस्था लावण्यात येत असल्याचे संस्थानचे अध्यक्ष बापूसाहेब बेद्रे यांनी सांगितले.

खेटा घालण्याची भाविकांमध्ये लागते स्पर्धाच गावातील पंचक्रोशीतील भाविक घटस्थापनेच्या दुसऱ्या दिवसापासून देवीच्या डोंगराला खेटा (प्रदक्षिणा) घालण्याची पद्धत रूढ झाल्याने लोक पाच दिवस भल्या पहाटेपासून खेटा घालतात. मंदिराला पहाटे खेटा घालण्याची जनु भाविकात स्पर्धाच असल्याचे चित्र असते. नवरात्र महोत्सव,चैत्र पौर्णिमा, नारळी पौर्णिमा हे उत्सव गर्दीचे असतात. देवीच्या डोंगराला दोरा वाहून कोणी साकडे घातले तर कोणी नवस पूर्ण झाला म्हणून देवीच्या डोंगराला दोरा वाहून खेटा घालतात. यामुळे लाखो भाविक येडेश्वरी देवीच्या डोंगराभोवती दोरा वाहतात.

दरम्यान तुळजापूर देवीच्या दर्शनाला येणारा भाविक येडेश्वरी देवीचे दर्शनासाठी येतो.

# शिवप्रतिष्ठान संस्थेचा राज्यस्तरीय महाराष्ट्र समाजरत्न पुरस्कार २०२५ प्रशांत शशिकांत मते यांना जाहीर



धाराशिव (प्रतिनिधी)- शिवप्रतिष्ठान संस्था, साई पार्क सोसायटी, पद्मावती रोड,आळंदी देवाची,ता. खेड जि.पुणे या संस्थेचा प्रशांत शशिकांत मते यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन राज्यस्तरीय महाराष्ट्र समाजरत्न पुरस्कार २०२५ प्रशांत शशिकांत मते यांना जाहीर करण्यात आला. हा पुरस्कार दिनांक - २६/१०/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर धर्मशाळा पद्मावती रोड, आळंदी देवाची , पुणे येथे आयोजित करण्यात आलेल्या शिव प्रतिष्ठान पुरस्कार वितरण सोहळ्यात प्रदान करण्यात येणार असल्याचे शिव प्रतिष्ठान संस्थेचे अध्यक्ष श्री.मदनजी रेनगडे पाटील यांनी कळवले आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## मराठवाडा मुक्ति दिनाचा इतिहास सर्वांना कळावा

१७ सप्टेंबर म्हटले की, मराठवाडा मुक्तिदिन आठवतो. देशाला स्वातंत्र्य १५ ऑगस्ट १९४७ ला मात्र मराठवाडा हा पारतंत्र्यात होता. येथे हैद्राबादच्या निजामाचे सरकार होते. देशात अनेक ठिकाणी राजे होते. अनेक राजे हे स्वातंत्र्यानंतर भारतात विलीन झाले होते. निजाम हा भारतात सामिल होण्यास तयार नव्हता. भारताचे पहिले गृहमंत्री लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांनी या बाबत निजामाला विलिन होण्यास सांगितले असता तो विलिन होण्यात नकार देत होता. त्यामुळे मोठी समस्या होती. देशातच महाराष्ट्र व महाराष्ट्रात पारतंत्र्य भोगावे लागत होते. त्यामुळे मराठवाड्यातील जनता दिशाहीन बनली होती. यावेळी मराठवाड्याकडे कोणाचे लक्ष नव्हते. हैद्राबादच्या निजामाच्या तावडीत असलेल्या मराठवाड्यातील जनतेला 'वंदे मातरम्' म्हणण्याची मुभा नव्हती. सर्व काही निजामाचे कायदे चालत होते. मुस्लीम समाजाचा राजा असल्याने याच समाजाचे वर्चस्व अधिक होते. या बाबत स्टेट हैद्राबादमध्ये आर्यसमाजच्या माध्यमातून स्वामी रामानंद तिर्थ यांनी काही निवडणुक कार्यकर्ते घेऊन आझादी मागू लागली. देश स्वतंत्र झाला आम्हालाही तिरंगा फडकावण्याची मुभा मिळावी. जयहिंद म्हणता यावे. असा अग्रह धरून एक मराठवाडा मुक्ती संग्रामचा लढ उभा राहीला. याला भरघोष असा प्रतिसाद मिळाला. मराठवाडा मुक्ती संग्राम हा केवळ पुरुषांनी लढला नाही तर वीर महिलांनी यात सहभाग घेतला होता. निजामाशी लढताना भरमार चालविणे, बंदुका चालविणे, दांडपट्टा चालविणे यात महिला प्रविण झाल्या होत्या. मुळात मराठवाडा मुक्तीसंग्राम काय आहे हे समजून घेणे गरजेचे आहे. भारत स्वतंत्र झाल्यानंतर देखील मराठवाडा हा पारतंत्र्यात होता. १७ सप्टेंबर १९४८ ला हा लढा पूर्ण होऊन भारतात हैदराबाद संस्थानातून मुक्त होऊन तो स्वतंत्र भारताचा भाग झाला. मराठवाड्याचा इतिहास बघितला तर हैदराबाद मध्ये दिल्लीचा सुभेदार निजाम- उल-मुल्क यांनी निजामशाही स्थापन केली होती. या प्रदेशात तीन भाषा बोलणारे लोक राहत होते. त्यामध्ये मराठी, तेलगु, कन्नड या भाषा बोलल्या जात होत्या. या काळात भाषेप्रमाणे त्या प्रदेशाची नावे झाली व त्यामधून मराठी भाषा बोलणाऱ्यांचा 'मराठवाडा' हे नाव! मराठवाड्याचा इतिहास बघितला तर सातवाहन घराण्याची सत्ता या प्रदेशावर असलेली दिसते. कारण आज देखील सातवाहन कालीन नाणी आपल्याला या भागात मोठ्या प्रमाणात सापडतात. वाकाटक, चालुक्य, राष्ट्रकुट इत्यादी घराण्यांची सत्ता या प्रदेशावर असलेली दिसते. आज मराठवाड्याचा विचार केला तर छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, बीड, जालना, परभणी या जिल्ह्यांचा समावेश आहे. आर्यसमाजाची स्थापना मुंबई येथे १८७५ साली स्वामी दयानंद सरस्वती यांनी केली. स्वामी दयानंद सरस्वती यांचे कार्य भारतीय इतिहासात महत्त्वाचे आहे. वैदिक तत्त्वज्ञानाचे आचरण केल्याशिवाय या देशाला तरणोपाय नाही असे, ते म्हणत असत. व याच विचारांनी त्यांनी आर्यसमाजाची स्थापना केली. वैदिक धर्माचा प्रसार व प्रचार या सभेच्या माध्यमातून त्यांनी मोठ्या प्रमाणात केला. वैदिक धर्माच्या प्रसारामध्ये आर्यसमाजाची योगदान मोठ्या प्रमाणात आहे. मराठवाड्याच्या मुक्तिसंग्रामात देखील आर्य समाजाचे योगदान, कार्य महत्त्वाचे आहे. हैदराबाद स्टेट मध्ये इसवी सन १९२० मध्ये आर्यसमाजाची स्थापना झाली. या समाजाचा विस्तार तेलंगाना, कर्नाटक या भागाच्या तुलनेत मराठवाड्यात जास्त झाला. त्यामध्येही धाराशिव व लातूर या भागामध्ये यांची संख्या जास्त प्रमाणात आहे. हैदराबादचे विनायकराव कोरटकर हे आर्य समाजाचे अध्यक्ष होते. उदगीर येथे त्यांनी आर्यसमाजाचे मुख्य कार्यालय उघडले. आर्य समाजाने 'वैदिक संदेश' या नावाचे वृत्तपत्र सोलापूर येथून प्रकाशित करण्यात सुरुवात केली. अत्यंत शिस्तप्रिय व ध्येयवादी संघटना म्हणून या संघटनेकडे पाहिले जात होते. स न १९३० ते १९४० या कालखंडात आर्यसमाजाचे कार्य जोमाने सुरू होते. हे कार्य वाढत असल्याने निजाम सरकारने त्यांच्या विरोधात कारवाई करण्यास सुरुवात केली. 'सत्यार्थप्रकाश' हा महत्त्वाचा ग्रंथ ज्याच्या हातात दिसेल त्याला निजाम पोलीस अटक करीत असत. निजामाच्या या कारवाईचा निषेध म्हणून गावोगावी तरुणांनी एकत्र येऊन आर्यसमाजाच्या संघटनांची स्थापना केली. आर्य समाजातील विविध नेत्यांनी हिंदूंना एकत्र करून यांनी निजामाच्या विरोधात एकत्र येण्यास सुरुवात केली. अनेक गावात मंदिरे स्थापन केली. मुस्लिम धर्मप्रसाराविरोधात आर्यसमाजाचे मोठे कार्य झालेले दिसून येते. या कार्यामुळे निजामांच्या धर्मांतर मोहिमेवर आळा बसलेला दिसून येतो. निजामाच्या अन्यायकारक धोरणाला आर्यसमाजाने मोठ्या प्रमाणात विरोध केला. इसवी सन १९३० ते १९४० या काळात आर्यसमाजाचे कार्य जोमाने वाढत होते. हिंदू समाजाला एकत्र करण्याचे काम मोठ्या प्रमाणात सुरू होते. सध्याच्या उमरगा तालुक्यातील 'गुंजोटी' हे गाव या काळात महत्त्वाचे केंद्र होते. 'इत्तेहादुल मुस्लिम' या एका जातीयवादी संघटनेला उत्तर म्हणून गुंजोटी या गावात तरुणांची एक संघटना निर्माण झाली. १९२७ साली गुंजोटी मध्ये श्रीकृष्ण पाठशाला, श्रीकृष्ण वाचनालय, व्यायाम शाळा यांची स्थापना करण्यात आली. इसवी सन १९३६ मध्ये गुंजोटी येथे आर्यसमाजाची स्थापना करण्यात आली. या संस्थेच्या माध्यमातून शिक्षण, सत्संग, निर्भयवृत्ती, व्यायाम हे गुण तरुणांमध्ये आत्मसात करण्याचे काम केले. तरुणांचे मोठ्या प्रमाणामध्ये एकत्रिकरण केले. या मराठवाडा मुक्ती संग्रामात पहिले बलिदान 'वेद प्रकाश आर्य' यांचे झाले. अवघ्या २० व्या वर्षी त्यांनी आपले बलिदान या लढ्यासाठी दिले. त्यांचे मूळ नाव दासप्पा बसप्पा हर्के असून त्यांचा जन्म १९३७ साली झाला. आर्यसमाजाच्या माध्यमातून त्यांनी मोठ्या प्रमाणात तरुणांना एकत्र करण्याचे काम सुरू केले होते. त्यामुळे निजामांचा रोष त्यांना पत्करावा लागणार होता. २३ फेब्रुवारी १९३७ या दिवशी भाई बन्सीलाल गुंजोटीला येणार म्हणून त्यांच्या स्वागताची मोठी तयारी सुरू झाली. आजूबाजूच्या परिसरातील सर्व तरुण यांच्या स्वागतासाठी एकत्र आले. पण या कार्यक्रमासाठी भाई बन्सीलाल येऊ शकले नाहीत, त्यामुळे सगळे एकत्र आलेले तरुण आपापल्या गावी परत गेले. भाई बन्सीलाल या कार्यक्रमासाठी आले नसल्यामुळे वेद प्रकाश आर्य हे संध्याकाळी गावी परत आले. पण गावातील इत्तेहादुल मुस्लिम या संघटनेला वेदप्रकाश आर्य यांच्या विरुद्ध आधीपासून चीड होती. सायंकाळी वेदप्रकाश २०० ते २५० अरबांच्या हाती पडले, ते एकटेच असल्यामुळे त्यांचे मुंडके छाटण्यात आले. अशा प्रकारे या लढ्यातील पहिले बलिदान या दिवशी झाले. त्यांच्या या बलिदानाने हा लढा अधिक तीव्र स्वरूपात लढला गेला, व १७ सप्टेंबर १९४८ ला मराठवाडा स्वतंत्र झाला मात्र वेदप्रकाशजी बलिदान कदापी विसणारे नाही. मुळात मराठवाडा मुक्ती संग्रामाचा इतिहास सर्वांना कळाला पाहिजे. त्याची विस्तृत माहिती शालेय अभ्यासक्रमात असणे काळाची गरज आहे.

# वर्षअखेरीस वंदे भारत कोचची लातूरच्या प्रकल्पात निर्मिती सुरू

## मित्रचे उपाध्यक्ष, आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी घेतला आढावा

**धाराशिव-लातूर/प्रतिनिधी :** लातूर येथील रेल्वे कोच निर्मिती प्रकल्पात २०२५ अखेरपर्यंत वंदे भारतच्या डब्यांच्या निर्मितीला सुरुवात होणार आहे. सध्या या प्रकल्पाचे आधुनिकीकरण सुरू आहे. महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशनचे उपाध्यक्ष (मित्र) आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सोमवारी या प्रकल्पाला भेट देऊन आढावा घेतला. त्यावेळी अधिकाऱ्यांसोबत झालेल्या चर्चेत ही माहिती समोर आली.

आमदार पाटील हे सोमवारी लातूरच्या दौऱ्यावर होते. या दौऱ्यात त्यांनी बार्शी रोडवरील सारथी इमारतीच्या बांधकामाची पाहणी करून आढावा घेतला. त्यानंतर रेल्वे कोचनिर्मिती प्रकल्पाला भेट दिली. मित्रच्या उपक्रमाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात लातूर जिल्ह्याची आढावा बैठकही घेतली. याअंतर्गत स्वयंरोजगार निर्मितीसाठी कोणते उपक्रम राबवता येतील, याबाबत चर्चा करण्यात आली.

रेल्वे कोच प्रकल्पाला रस्त्यांनी जोडणार

रेल्वे निर्मिती कोच प्रकल्पात सध्या काय सुरू आहे, याचा आढावा आमदार पाटील यांनी घेतला. या प्रकल्पातून प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे किती जणांना रोजगार मिळेल, याबाबतही चर्चा झाली. प्रकल्पाच्या परिसरात सब व्हेंडर्स कसे उपलब्ध करता येतील, साहित्याची ने-आण करण्यासाठी प्रकल्पाची रोड कनेक्टिव्हिटी कशी वाढवता येईल, या मुद्द्यांवरही चर्चा करण्यात आली. उपजिल्हाधिकीर संगीता टकले, कायनेटचे व्यवस्थापकीय संचालक



के. सत्यमूर्ती, एमआयडीसीचे क्षेत्रीय व्यवस्थापक डी. व्ही. खाडे, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी आदी उपस्थित होते.

या सुविधांनी सज्ज असेल सारथी भवन

बार्शी रोडवर उभारणी सुरू असलेल्या सारथी भवनच्या बांधकामाची आमदार पाटील यांनी पाहणी केली. या भवनामुळे आगामी काळात मराठा समाजातील विद्यार्थ्यांची मोठी सोय होणार आहे. लातूर विभागीय केंद्राच्या धर्तीवर धाराशिव येथेही चार एकरांवर भव्य सारथी भवनाची उभारणी करण्यात येणार आहे, असे आमदार पाटील यांनी सांगितले. अत्याधुनिक प्रशिक्षण केंद्र, सुसज्ज प्रशासकीय इमारत, मुली आणि मुलांसाठी प्रशस्त वसतिगृहे, आधुनिक अभ्यासिका आणि भव्य ऑडिटोरीयमचा सारथी भवनात समावेश असेल. उपजिल्हाधिकारी श्रीमती अहिल्या गाठाळ, अधीक्षक अभियंता बाबासाहेब थोरात आदी उपस्थित होते.

लातूर येथील रेल्वे कोचनिर्मिती प्रकल्पात अधिकाऱ्यांनी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांचे स्वागत केले

# शेतकरी दांपत्य व माजी आमदार धिरज देशमुख यांच्या हस्ते तावरजा प्रकल्प जलपूजन संपन्न

## प्रकल्पाची दुरूस्ती करून बारमाही पाणी उपलब्ध करून दिल्या बद्दल ग्रामस्थांकडून धिरज देशमुख यांचे आभार

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर ग्रामीण मधील तावरजा प्रकल्पाची दुरूस्तीचे काम पूर्णत्वास आले व हा प्रकल्प प्रथमच पूर्ण क्षमतेने भरला आहे. याचे औचित्य साधून धिरज विलासराव देशमुख तसेच श्री व सौ. नामदेव शिंदे (सावरगाव),श्री व सौ. अंबादास कदम (लखनगाव),श्री व सौ. बब्रुवान मोरे (धानोरी), श्री व सौ. नानासाहेब सूर्यवंशी (उटी खु.) श्री व सौ. काशिनाथ खराबे(उटी बू.) यांच्या हस्ते सपत्नीक जलपूजन संपन्न झाले.



तावरजा प्रकल्पाचे दरवाजे नादुरुस्त असल्याने मोठ्या प्रमाणात पाणी वाया जात होते.लातूर ग्रामीणचा आमदार म्हणून निवडून आल्यानंतर काही महिन्यातच धिरज विलासराव देशमुख यांनी महाविकास आघाडी सरकारच्या माध्यमातून तत्कालीन पालकमंत्री अमित विलासराव देशमुख, तत्कालीन मंत्री जयंत पाटील यांच्या सहकार्याने ४२ कोटींचा निधी मंजूर करून घेतला व तावरजा प्रकल्प दुरुस्तीच्या कामास प्रत्यक्षात सुरुवात करून दिली आता प्रकल्पाची दुरुस्ती झाल्याने मोठ्या प्रमाणात वाहून जाणाऱ्या पाण्याचा संचय होत आहे. चालू वर्षी पाऊस चांगला झाल्याने तावरजा प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरला आहे सर्वांसाठी हा क्षण स्वप्नपूर्तीचा असल्यामुळे ग्रामस्थ आनंदी व समाधानी आहेत बारमाही पाणी उपलब्ध करून दिल्याने ग्रामस्थांनी माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांचे आभार व्यक्त केले आहेत.

जल पूजन प्रसंगी आपल्या मनोगतात प्रदेश काँग्रेसचे प्रवक्ते, माजी आमदार व जिल्हा बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख म्हणाले की, कोणत्याही भागाचा सर्वांगीण विकास साधायचा असेल तर तिथे सिंचनाची कामे मोठ्या प्रमाणात व्हायला हवीत. हा दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून लोकनेते विलासराव देशमुख साहेबांनी सिंचनाच्या कामांना प्राधान्य दिले होते. तोच विचार अंगीकारून आपण राजकीय वाटचाल करत असून तावरजा प्रकल्पाची दुरुस्तीसाठी जे काही प्रयत्न करता आले त्यातून शेतकऱ्यांना आधार मिळाला आहे. पूर्ण क्षमतेने पाणी साठवले जाणार असल्याने शेतीसाठी याचा मोठ्या प्रमाणात लाभ होणार आहे. भविष्यात देखील ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी जे काही करणे शक्य आहे ते निश्चितपणे करत राहू असे आश्वासन त्यांनी याप्रसंगी दिले.

यावेळी २१ शुगरचे उपाध्यक्ष विजय देशमुख, जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष प्रमोद जाधव,माजी जिल्हा परिषद अध्यक्ष संतोष देशमुख, विलास कारखाना माजी व्हा चेअरमन रविंद्र काळे,उपअभियंता नितीन पाटील, ओम थोरमोटे, नागेश तोंडारे, मदन भिसे, भैरवनाथ सुर्यवंशी, नवनाथ काळे, महेश सुर्यवंशी, श्रीनिवास शेळके,सदाशिव कदम, रसुल पटेल,रामदास सुर्यवंशी,महेंद्र मुळे, रामराव ढगे, नानासाहेब जाधव,सचिन शिंदे,दिनकर सुर्यवंशी,अनिल पाटील, दयानंद बिडवे, डॉ दिनेश नवगिरे, रामानंद जाधव, गणेश ढगे आदींची उपस्थिती होती.

# ज्ञानदीप प्रज्वलित करणारे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ

१७ सप्टेंबर ही तारीख मराठवाड्याच्या दृष्टीने दोन अर्थांनी ऐतिहासिक ठरते. एकीकडे हाच दिवस म्हणजे मराठवाड्याच्या मुक्तीसंग्रामाला अभूतपूर्व यश मिळाल्याचा दिवस, तर दुसरीकडे शिक्षणप्रसार, सामाजिक न्याय आणि प्रगतिशील विचारसरणीची परंपरा जोपासणारे 'स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ' स्थापन झाल्याचा दिवस. मराठवाडा प्रदेशाचा शैक्षणिक आणि सामाजिक इतिहास समृद्ध असून त्यात १७ सप्टेंबर हा दिवस विशेष स्थान राखतो. या दिवशी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाची स्थापना झाली, ज्यामुळे ज्ञानप्रसार, सामाजिक समता, संशोधन आणि सांस्कृतिक संवर्धन या क्षेत्रांत नवा अध्याय सुरू झाला. हे विद्यापीठ केवळ शिक्षणाचे केंद्र नाही, तर मराठवाडा भागातील ग्रामीण-शहरी समाजातील सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असलेल्या अग्रगण्य शैक्षणिक संस्थांपैकी एक आहे. स्वामी रामानंद तीर्थ हे स्वातंत्र्यसैनिक, समाजसुधारक, लोकशिक्षक आणि वंचितांसाठी लढणारे जननायक होते. त्यांच्या जीवनकार्याने समाजात समानता, बंधुता आणि जनहिताची भावना जागवली. त्यांच्या नावाने स्थापन झालेल्या विद्यापीठाने त्यांच्या विचारसरणीची जोपासना करत, विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत सामाजिक जबाबदारी, नैतिक मूल्ये, सहकार्य आणि नेतृत्वगुण आत्मसात करण्याची संधी दिली आहे. वर्धापनदिन हा फक्त विद्यापीठाच्या स्थापनेचा उत्सव किंवा एका विद्यापीठाच्या प्रवासाचा टप्पा नसून, तो मराठवाड्यातील ज्ञानवृद्धी, सामाजिक समता, सांस्कृतिक संवर्धन आणि ग्रामीण विकासाच्या प्रवासाचा गौरव दिन मानला जातो.




स्वामी रामानंद तीर्थ यांचे जीवन संघर्षमय होते. निजामशाहीच्या काळात मराठवाडा सामाजिक अन्याय, आर्थिक विषमता आणि राजकीय दडपशाहीने ग्रस्त होता. त्या काळात त्यांनी सामान्य माणसासाठी शिक्षण, समानता आणि स्वातंत्र्याचे संदेश देत जनतेत जागृती निर्माण केली. त्यांचा असा विश्वास होता की समाजाची खरी प्रगती शिक्षणामुळेच शक्य आहे. शिक्षण हे केवळ पदवी मिळवण्याचे साधन नसून समाज बदलण्याचे शक्तिशाली माध्यम आहे, असे त्यांनी ठामपणे मानले. त्यांच्या विचारांनी प्रेरित होऊन, विद्यमान समाजातील दुर्बल घटकांपर्यंत शिक्षण पोहोचविण्याचा प्रयत्न विद्यापीठाच्या स्थापनेतून दिसून येतो. १७ सप्टेंबर १९९४ साली स्थापना झालेल्या या विद्यापीठाने नांदेड, लातूर, हिंगोली आणि परभणी जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांसाठी उच्चशिक्षणाचे दारे उघडले. विद्यापीठाचे उद्दिष्ट फक्त शिक्षण देणे नसून, ग्रामीण आणि मागासलेल्या समाजातील विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध करून देणे, त्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे आणि संशोधनासाठी प्रोत्साहन देणे हा आहे. स्थापनेपासून आजपर्यंत विद्यापीठाने स्थानिक गरजांशी सुसंगत अभ्यासक्रम तयार केले आहेत आणि हजारो विद्यार्थ्यांचे जीवन घडवले आहे. या विद्यापीठातून उच्चशिक्षण घेऊन बाहेर पडलेले विद्यार्थी शिक्षण, संशोधन, प्रशासन, उद्योग, सामाजिक कार्य अशा विविध क्षेत्रांत कार्यरत असून समाजात मूल्यवर्धन करीत आहेत.

विद्यापीठाच्या शैक्षणिक संरचनेवर लक्ष दिले, तर कला, विज्ञान, वाणिज्य, समाजशास्त्र, कायदा, व्यवस्थापन, संगणकशास्त्र, तंत्रज्ञान, भाषा आणि साहित्य अशा अनेक शाखांमध्ये उच्चशिक्षण उपलब्ध आहे. आधुनिक प्रयोगशाळा, संगणक केंद्रे, डिजिटल शिक्षण सुविधा, ग्रंथालय आणि शैक्षणिक सॉफ्टवेअर या माध्यमातून विद्यार्थ्यांना ज्ञानप्राप्तीची संधी दिली जाते. स्थानिक गरजांशी जुळवून विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख, संशोधनाभिमुख आणि कौशल्याभिमुख शिक्षण उपलब्ध करून देण्यात येते. ग्रामीण भागातील विद्यार्थी उच्चशिक्षित होऊन स्थानिक तसेच जागतिक स्तरावर स्पर्धा करण्यास सक्षम होत आहेत, ज्यामुळे विद्यापीठाचे स्थान आणि योगदान अधिक दृढ होत आहे. संशोधनाच्या क्षेत्रात विद्यापीठाची कामगिरी उल्लेखनीय आहे. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदांचे आयोजन, संशोधन प्रकल्प, आंतरशाखीय अभ्यास आणि व्याख्यानमाला यांमुळे विद्यार्थ्यांना संशोधनाची वृत्ती रुजविण्यास प्रोत्साहन मिळते. विज्ञान, तंत्रज्ञान, समाजशास्त्र, कृषी, पर्यावरण, भाषा, इतिहास, संस्कृती, लोकजीवन, आरोग्य आणि पोषण या क्षेत्रांमध्ये विद्यापीठाने संशोधनासाठी सक्षम व्यासपीठ निर्माण केले आहे. नांदेड आणि आसपासच्या ग्रामीण भागातील जीवनातील प्रश्न आणि आव्हाने यावर अभ्यास करून ठोस उपाय आणि शिफारसी विद्यार्थ्यांच्या आणि संशोधकांच्या माध्यमातून समाजास दिल्या जातात.

विद्यापीठ हे समाजाभिमुख शिक्षणाचे प्रतीक आहे. विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणासोबत सामाजिक जाणीव, नैतिक मूल्ये, सहकार्य, नेतृत्वगुण, समाजसेवा आणि स्वच्छता यांचा विकास होतो. एनएसएस, एनसीसी, स्वच्छता अभियान, पर्यावरण संवर्धन, आरोग्य शिबिरे, महिला सक्षमीकरण, ग्रामीण विकास उपक्रम या माध्यमातून विद्यार्थी समाजाशी जोडले जातात. विविध सांस्कृतिक कार्यक्रम, साहित्यिक संमेलन, नाट्य, चित्रकला महोत्सव, राष्ट्रीय सण, विचारवंतांचे व्याख्यान अशा माध्यमांतून विद्यार्थ्यांमध्ये समाज, संस्कृती आणि प्रगतिशील विचारसरणीची जाणीव रुजवली जाते. स्त्री शिक्षणासाठी विद्यापीठाचे योगदान विशेष उल्लेखनीय आहे. पारंपरिक समाजरचनेत मुलींचे शिक्षण अनेकदा दुर्लक्षित केले जात असे, परंतु या विद्यापीठाने स्त्रियांना समान संधी दिल्या. आज त्या उच्चशिक्षित होऊन विविध क्षेत्रांत अभियंते, शिक्षक, समाजसेवक म्हणून कार्यरत आहेत. स्त्रियांचे सक्षमीकरण, रोजगारनिर्मिती, सामाजिक सहभाग वाढविणे आणि निर्णयक्षमता विकसित करणे हे विद्यापीठाच्या शिक्षण धोरणाचा महत्त्वाचा भाग आहे.

वर्धापनदिन हा फक्त उत्सवाचा क्षण नसून, आत्मपरीक्षणाचा आणि भविष्याच्या वाटचालीसाठी योजना आखण्याचा क्षण आहे. गेल्या तीन दशकांमध्ये विद्यापीठाने शैक्षणिक, संशोधनात्मक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात मोठी प्रगती केली आहे. डिजिटल शिक्षण, ऑनलाइन अभ्यासक्रम, ई-लायब्ररी, उद्योग-शैक्षणिक सहकार्य, कौशल्य विकास केंद्रे आणि संशोधन उपक्रम यामुळे विद्यार्थी जागतिक पातळीवर स्पर्धा करण्यास सक्षम झाले आहेत. रोजगाराभिमुख अभ्यासक्रम, उद्योजकता प्रोत्साहन आणि कौशल्याधारित शिक्षणामुळे विद्यार्थी आत्मनिर्भर होत आहेत. विद्यापीठाच्या सामाजिक बांधिलकीत ग्रामीण विकासाचा समावेश आहे. कृषी, बेरोजगारी, दुष्काळ, आरोग्य, पोषण, महिला सक्षमीकरण, स्थानिक उद्योग, जलसंधारण, पर्यावरण संवर्धन अशा क्षेत्रांवर संशोधन करून विद्यार्थ्यांनी ठोस उपाय शोधण्याचा प्रयत्न केला आहे. विद्यापीठाने स्थानिक समाजातील प्रश्नांचे निराकरण करून शैक्षणिक कामगिरीला व्यावहारिक स्वरूप दिले आहे, ज्यामुळे विद्यापीठाचा सामाजिक प्रभाव दृढ झाला आहे. विद्यापीठाच्या कार्याचा प्रभाव आंतरराष्ट्रीय स्तरावरही दिसतो. परदेशी विद्यापीठांसोबत शैक्षणिक देवाणघेवाण, आंतरराष्ट्रीय परिषद यामुळे विद्यार्थी जागतिक ज्ञान आणि अनुभवाशी जोडले जात आहेत. जागतिकीकरणाच्या युगात विद्यापीठाने विद्यार्थ्यांना जागतिक स्पर्धेसाठी तयार केले आहे.

वर्धापनदिनाचा उत्सव हा प्रेरणादायी क्षण आहे. या दिवशी संस्थापक, माजी कुलगुरू, शिक्षक, विद्यार्थी आणि कर्मचारी यांच्या योगदानाची आठवण करून दिली जाते. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे विद्यापीठाने आपली वाटचाल सुलभ केली आहे. माजी विद्यार्थी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर यशस्वी होत आहेत, जे विद्यापीठाच्या शिक्षणाची, संस्काराची आणि प्रेरणेची खरी ताकद दर्शवते. आज शिक्षण हे केवळ माहिती मिळवण्याचे साधन नाही, तर जीवन जिवंत करण्याचे माध्यम बनले आहे. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने ज्ञान, कौशल्य, सामाजिक जाणीव आणि नैतिक मूल्यांचा संगम साधला आहे. वर्धापनदिनाच्या निमित्ताने आपण भूतकाळातील संघर्ष, वर्तमानातील यश आणि भविष्याच्या संकल्पांचा गौरव करतो. शिक्षणाचा दीप समाजात सतत प्रज्वलित राहो, ग्रामीण व शहरी विद्यार्थी समान संधीने ज्ञानप्राप्ती करून समाजात सकारात्मक बदल घडवू शकतील, हीच या दिवशीची खरी अपेक्षा आहे.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ हे ज्ञान, संशोधन, संस्कृती आणि समाजसेवेचे एकत्रित रूप आहे. १७ सप्टेंबरचा वर्धापनदिन फक्त एका संस्थेचा नाही, तर संपूर्ण मराठवाड्याच्या शिक्षण, सामाजिक न्याय आणि प्रगतिशीलतेचा उत्सव आहे. हा दिवस आपल्याला भूतकाळातील संघर्ष आठवून देतो, वर्तमानातील कार्याचे महत्त्व पटवून देतो आणि भविष्याच्या वाटचालीसाठी प्रेरित करतो. विद्यापीठाने प्रज्वलित केलेला ज्ञानदीप पुढील पिढ्यांपर्यंत उजळत राहो आणि मराठवाड्यातील



प्रत्येक घरापर्यंत शिक्षणाचा किरण पोहोचो, हीच खरी कामगिरी ठरेल.

**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी विद्यार्थी आहेत)
मो. क्र. ९९६०१०३५८२

# मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन : एक गौरवगाथा

मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन हा महाराष्ट्रातील एक राजकीय उत्सव आहे. हा सण दरवर्षी १७ सप्टेंबर रोजी साजरा केला जातो. या दिवशी १९४८ मध्ये मराठवाड्यातील निजामाची सत्ता संपली आणि हा भाग भारताचा एक बनला.

इतिहास

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला, पण त्यावेळी संपूर्ण देश विविध संस्थानांमध्ये विखुरलेला होता. त्यावेळच्या ५६५ पैकी ५६२ संस्थानांनी स्वतंत्र भारतात सामाविष्ट होण्याची संमती दर्शविली आणि तशी कार्यवाही केली. मात्र हैदराबाद संस्थान, जम्मू आणि काश्मीर आणि जुनागड संस्थान ही तीन संस्थाने स्वतंत्र भारतात सामाविष्ट झाली नव्हती.



हैदराबाद संस्थानावर निजाम मीर उस्मान अली खान यांचे राज्य होते. हैदराबाद संस्थानावर तब्बल सहा पिढ्यांपासून निझाम वंशाचे राज्य होते.१ त्यांच्या निजामांच्या राज्यातून मुक्त होऊन भारतीय संघराज्यात सामाविष्ट होण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण हैदराबाद संस्थानात मुक्ती संग्राम चालू झाला होता. हैदराबाद संस्थानची त्यावेळची लोकसंख्या १ कोटी ६० लाख होती. यात तेलंगणा, मराठवाडा आणि कर्नाटकचा काही भाग येत होता. मुक्ती संग्राम सुरू झाल्यावर निजामाचा सेनापती कासीम रझवी याने मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन या संघटनेच्या माध्यमातून रझाकार नावाने मुस्लिम स्वयंसेवकांची भरती केली आणि त्यांच्या साह्याने जनतेवर अमर्याद अत्याचार चालू केले.२३४५

**रझाकार कासीम रझवी**–याचे नेतृत्व स्वामी रामानंद तीर्थ, दिंगबरराव बिंदू, गोविंदभाई श्रॉफ, रविनारायण रेड्डी, देवीसिंग चौहान, भाऊसाहेब वैशंपायन, शंकरसिंग नाईक, विजयेंद्र काबरा, बाबासाहेब परांजपे या आणि इतर अनेक नेत्यांकडे होते. मराठवाडयाच्या गावागावात हा संग्राम लढला गेला. यात जीवाची काळजी न करता अनेक स्वातंत्र्यवीर पुढे आले. मराठवाडयात निजामांच्या पंतप्रधानास थांबवण्यासाठी पूल उडवून देणारे काशीनाथ कुलकर्णी, मुक्ती संग्राम लढ्यातील स्वयंसेवकांना शस्त्र बनवून पुरवणारे उस्मानाबाद जिल्ह्यातील भूम चे गणपतराव क्षीरसागर सुतार ,मराठवाडयाची राणी लक्ष्मीबाई म्हणून विख्यात झालेल्या बदनापूर तालुक्यातील धोपटश्र्वर गावच्या दगडाबाई शेळके, रोहिल्यांना जेरीस आणणारे बीडचे विठ्ठलराव काटकर, बर्दापूर पोलीस ठाणे उडवून देणारे लातूरचे हरिश्चंद्रजी जाधव,लातूर येथेल बोरी या ठिकाणाहून निजामाचा बराच कारभार चालायचा भारतीय सैनिकांनी मराठवाड्यावर धावा बोलताच धोंडिबा शंकर सिरसाट यांनी अजूबाजूची निजामांच्या ठाण्यावर हल्ला चढवला व निजामी सैन्याना खदडुन हद्दपार केले सर करणारे उस्मानाबाद जिल्हयातील होटी गावचे जनार्दन होटींकर गुरजी तसेच परभणीत रझाकारांना हुसकावून लावणारे सूर्यभान पवार, विनायकराव चारठाणकर, विश्र्वनाथराव कातनेश्र्वरकर, पालम तालुक्यातील गुळखंड गावचे सुपुत्र मारोतराव पौळ , पाथरी येथील देवरावजी नामदेवराव कांबळे, नांदेड येथील देवरावजी कवळे, जीवनराव बोधनकर आदींच्या रूपाने मराठवाड्याच्या कानाकोपऱ्यात स्वातंत्र्य संग्राम तेजस्वीपणे लढला गेला.

या मुक्ती संग्रामात श्रीधर वर्तक, जानकीलालजी राठी, शंकरराव जाधव, जालन्याचे जनार्दन मामा, किशनसिंग राजपूत,गोविंदराव पानसरे, बहिर्जी बापटीकर, राजाभाऊ वाकड,विश्र्वनाथ भिसे,जयंतराव पाटील आदींसारख्यांनी आपल्या जीवाची तमा न बाळगता काम केले. या सर्व हुतात्म्यांनी आणि मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्य सैनिकांनी केलेल्या संग्रामाचे मोल काढणे शक्य नाही. यासीन जूबेर हैद्राबादी मंत्री याने मुक्तीसेनेने ताब्यात घेतलेली परत घेण्याची प्रतिज्ञा केली त्यामुळे औरंगाबाद जिल्ह्यातील वैजापूर तालूक्यातील जातेगाव माळावर निजामाच्या सैन्याला पुढे सरकु दिले नाहीत यामध्ये मानसिंग राजपुत, लक्ष्मण आवचार, रामलाल राजपूत, व रामचंद्र धंदेवार हे आघाडीवर होते यामध्ये रामचंद्र धंदेवार यांना बाळगिर मठ सरला येथे बंदुकीच्या गोळीने वेध घेतल्याने हुतात्म झाले त्यावेळी गोदामाय दुथडी भरून वाहत होती. रामचंद्र याना सिरसागर नावाच्या मर्दाने शहीदास आपल्या पाठीवरून पैलतीरी आणून भर पावसात खड्डा केला व त्यांची विधी पूर्ण केली.निझाम शासनाचे हे अत्याचार एवढे अमर्याद होते की हैदराबाद मुक्तिसंग्रातील काँग्रेस कार्यकर्यांच्या शस्त्रे हाती घेऊ देण्याच्या विनंतीस स्वतः महात्मा गांधींनी सुद्धा संमती दिली.६. शेवटी भारताचे तात्काळीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी निझाम शासनाच्या विरोधात पोलीस कार्यवाहीची घोषणा केली. ११ सप्टेंबर १९४८ रोजी ऑपरेशन पोलो अंतर्गत मेजर जनरल जे.एन चौधरीच्या नेतृत्वाखाली पाच दिशेने निझाम संस्थानावर कारवाई चालू झाली. मुख्य सैन्य सोलापूरकडून शिरल्या. पहाटे ४ वाजता ऑपरेशन सुरू झाल्यावर २ तासांत नळदुर्ग व सायंकाळपर्यंत तुळजापूर, परभणी ते मणिगढ, कनेरगाव, विजयवाड्याकडील बोनाकल ताब्यात घेतले. चाळीसगावकडून आलेल्या तुकडीने कन्नड, दौलताबाद तर बुलढाण्याकडेच्या तुकडीने जालना शहर ताब्यात घेतले. दुसरीकडे वारंगळ, बीदर विमानतळावर भारतीय सैनिकांनी हल्ले केले. १५ सप्टेंबर रोजी औरंगाबाद सर करून सैन्य पुढे निघाल्या.

भारतीय सैन्यापुढे रझाकार फार वेळ टिकू शकले नाहीत. निजामी सैन्य माघार घ्यायला लागले आणि कासीम राजवीला अटक झाली. शेवटी १७ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबादचे सैन्यप्रमुख जन अल इद्रीस यांनी शरणांगती स्वीकारली आणि निझाम पराभव मानले आणि हैदराबाद संस्थान भारतात विलीन झाले आणि हैदराबाद संस्थानात तिरंगा फडकला.



# आणखी एका शेजाऱ्याच्या घरात...


शेजारच्या घरात आग लागते, त्याची धग आपल्यापर्यंत येते; त्यामुळे नेहमी काळजी घ्यावी, असं म्हटलं जातं. देशाच्या पातळीवर विचार केला, तर भारताच्या शेजारी असलेल्या मित्र राष्ट्रांमध्ये ज्या घडामोडी वेगाने घडत आहेत, त्याकडे काळजीपूर्वक लक्ष देण्याची गरज आहे.

गेली अनेक दशके शांत असलेला नेपाळ अलीकडच्या काळात अस्थिरतेच्या गर्तेत का सापडला आहे? याची कारणं त्यासाठी शोधावी लागतील. मंत्र्यांना आंदोलकांनी घरात घुसून सळो की पळो करून सोडलं, नेपाळच्या राष्ट्रपतींसह पंतप्रधान, गृहमंत्र्यांना २४ तासांत राजीनामा द्यावा लागेल, हे दोन दिवसांपूर्वी कोणाच्या स्वप्नात आले नसेल. पण, ते प्रत्यक्ष घडलं. पशुपतीनाथाच्या भूमीत जनतेचे तांडवरूपी रौद्ररूप पाहून सत्तेच्या सिंहासनावर बसलेल्यांना पायउतार व्हावं लागलं. नेपाळ सरकारने नुकतेच एक नवीन विधेयक संसदेमध्ये आणलं होतं, ज्यात परदेशात चालविणाऱ्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मना स्थानिक प्रतिनिधी नियुक्त करणं हे बंधनकारक केलं होतं. त्यानंतर, ४ सप्टेंबरला नेपाळ सरकारने फेसबुक, इंस्टाग्राम आणि यूट्यूबसह २६ सोशल मीडिया ॲप्सवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला. हे प्लॅटफॉर्म नेपाळच्या दळणवळण आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाकडे नोंदणीकृत नसल्याचा सरकारचा आक्षेप होता. नेपाळ सरकारने जर सोशल मीडिया ॲपवर बंदी घातली, ती सर्व अमेरिका आणि युरोपमधील असल्याने चीनमध्ये त्यावर आधीपासूनच बंदी आहे. चीनने पाश्चात्य देशांची विचारसरणी रोखण्यासाठी स्वतःचे ॲप विकसित केले आहेत. नेपाळमध्येही त्याच धर्तीवर प्रयत्न सुरू केले गेले. दुसरीकडे चिनी ॲप्सवर का बंदी घालण्यात आली नव्हती, याचंही नेपाळी जनतेला आश्चर्य वाटत होतं. नेपाळमधील युवावर्गामध्ये नेपाळ सरकारच्या या निर्णयाने प्रचंड संतापाची लाट उसळली. राजधानी काठमांडूसह देशभरात निदर्शनं उसळली. संतप्त तरुणांनी काठमांडूच्या नवीन बाणेश्वर संसद संकुलात घुसखोरी केली. पोलिसांचे बॅरिकेड्स तोडून त्यांनी संसदेच्या आवारात घुसखोरी केली, ज्यामुळे तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली. नेपाळी काँग्रेसचे अध्यक्ष आणि माजी पंतप्रधान शेर बहादूर देऊबा यांच्या बुढानिलकांठा येथील निवासस्थानाचीही निदर्शकांनी तोडफोड केली. हिंसक जमावापुढे सरकारला नांगी टाकावी लागली.

नेपाळमध्ये तरुणाईला 'जेन-झी' नावाने संबोधलं जातं. सोशल मीडियावरील बंदीनंतर हा मोठ्या प्रमाणात रस्त्यावर आलेला दिसला. सरकारने मोठ्या खुबीने सुप्रीम कोर्टाची ढाल पुढे करून बंदीचा आदेश आणल्याने युवा वर्गाने सुरुवातीला शांततापूर्ण आंदोलनांची शपथ घेतली. पण, पोलिसांनी त्यांना रोखण्यासाठी अश्रूधुराच्या नळकांड्या आणि पाण्याच्या तोफांचा वापर सुरू केल्याने परिस्थिती चिघळली. मोठ्या प्रमाणात गोंधळ उडाला. डिजिटल जगाशी जोडली गेलेली लाइफलाइन कापली गेल्याने अस्वस्थ झालेला तरुण कसा हिंसक बनतो, याचं या निमित्ताने उदाहरण जगासमोर आलं. केवळ नेपाळमधीलच नव्हे; जगभरातील तरुण पिढी सोशल मीडियाच्या प्रभावाखाली आहे हे यातून दिसून आलं. मांजरीला घरात कोंडून ठेवलं तर ती नरडीचा घोट घेते. आज तरुण पिढीचं तसंच झालं आहे. सोशल मीडियाचा वापर हा तरुणाईच्या जगण्याचा एक भाग बनला असल्याने, अन्य देशात जर अशा बंदीचा निर्णय झाला, तर तिथेही नेपाळसारखी स्थिती उद्भवू शकते, हा इशारा यातून मिळाला आहे.

नेपाळमधील आंदोलनात २१ तरुणांचा बळी गेला आहे. सरकारने सोशल मीडियावरील बंदीचा निर्णय मागे घेण्याची घोषणा केल्यानंतरही आंदोलक शांत झाले नाहीत. आंदोलकांनी पंतप्रधान के. पी. शर्मा ओली यांचं निवासस्थान पेटवून दिलं. विशेष म्हणजे, आंदोलकांच्या प्रमुख मागण्यांमध्ये पंतप्रधान ओली यांच्या राजीनाम्याची मागणी होती. २०२२ च्या नोव्हेंबर महिन्यात नेपाळमध्ये झालेल्या निवडणुका या शेवटच्या सार्वत्रिक निवडणुका होत्या; नेपाळ काँग्रेस (एनसी) हा सर्वांत मोठा पक्ष ठरला असला, तरी 'कम्युनिस्ट पार्टी ऑफ नेपाळ-माओवादी सेंटर'(सीपीएन-एमसी)ने 'कम्युनिस्ट पार्टी ऑफ नेपाळ-युनिफाइड-मार्क्सिस्ट लेनिनिस्ट' (सीपीएन-यूएमएल) शी युती करून सरकार स्थापन केलं. त्यानंतर राजकीय डावपेचातून चार वेळा सत्तापालट झाला आणि २०२४ च्या जुलै महिन्यात सीपीएन-यूएमएल व एनसी या पक्षांनी संधान बांधून सरकार स्थापन केले. के. पी. शर्मा ओली पंतप्रधान पदावर आले. पक्षांच्या जोड्या बदलत राहिल्या, तरी मूळ समस्या तशाच होत्या. प्रशासनासंबंधात एकमत नसणं, एकाच व्यक्तीने एकतर्फी निर्णय घेणं आणि आपल्याला निर्णयप्रक्रियेतून बाहेर ठेवलं जात असल्याची कनिष्ठ पक्षाला भीती वाटणं या बाबी सत्ताधारी पक्षांच्या नेत्यांमध्ये दिसून येत होत्या. या आंदोलनात सहभागी असलेल्या तरुणांनी केवळ सोशल मीडिया बंदीलाच विरोध केला नाही, तर देशात वाढलेल्या भ्रष्टाचाराविरोधातही संताप व्यक्त केला आहे. हुकूमशाही वृत्तीच्या विरोधात रस्त्यावर आल्याचे विद्यार्थ्यांचं म्हणणं आहे. भारत आणि नेपाळ या दोन देशांतील संबंध भौगोलिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि धार्मिक समानतेवर आधारित आहेत. १९५० च्या शांती आणि मैत्री कराराने दोन देश जोडले गेले आहेत. या दोन देशांत रोटीबेटी संबंधांबरोबर भाषिक साम्यही आहे. भारताने आतापर्यंत नेपाळच्या सामाजिक-आर्थिक विकासासाठी महत्त्वपूर्ण योगदानही दिलं आहे. हिंदूंची मोठी लोकसंख्या असलेला देश म्हणून ओळख असली तरी बुद्धांचं जन्मस्थान असलेलं लुंबिनी हे स्थान नेपाळमध्ये असल्याने जगभरातील बौद्धधर्मीयांना नेपाळविषयी प्रचंड आस्था आहे. या सर्व पार्श्वभूमीवर बांगलादेश, श्रीलंका, मालदिवसह भारताच्या सीमेवरील देशात अस्थिरता आणि घुसखोरीचा प्रयत्न चीनी भाईकडून सातत्याने सुरू आहे. नेपाळमधील यादवीला तेच कारणीभूत असावेत, असा सूर आंतरराष्ट्रीय पातळीवर उमटतो आहे.

## वैवाहिक जीवनासाठी काही टिप्स



## डॉक्टर टीप्स



जर एखाद्या अन्नपदार्थामुळे वैवाहिक जीवन सुधारते, असं सिद्ध झालं तर ते पदार्थ हमखास विकले जातील. संतुलित आहार, सक्रिय लाईफस्टाईल आणि योग्य मानसिक आरोग्य या गोष्टी उत्तम सेक्स लाईफसाठी आवश्यक असतात. पण काही ठराविक नैसर्गिक अन्नपदार्थ तुमची लैंगिक क्षमता वाढवण्यासाठी उपयुक्त आहेत का?

लैंगिक सुख मिळवण्यासाठी एंडॉर्फिन हा घटक आवश्यक आहे. या घटकात निरोगी लैंगिक आयुष्यासाठी लागणारी आवश्यक तत्त्वं असतात. यामुळे एखाद्या व्यक्तीमध्ये कामेच्छा जागृत होते.लैंगिक आरोग्य सुदृढ राहावं यासाठी इतिहासात आणि विज्ञानात यामागे काही उपाय दिले आहेत. पण आहारामुळे खरंच सेक्स लाईफ सुधारतं का याचा आढावा घेऊ.

लैंगिक क्षमतेसाठी कालवं किती उपयुक्त?

लव्ह लाईफ उत्तम राखण्यासाठी दररोज ५० कालवं नाश्त्यामध्ये खावी असं म्हटलं जातं, पण लैंगिक आरोग्य आणि कालवं यांचं काय नातं आहे हे अजून सिद्ध झालेलं नाही. **(क्रमशः)**

## विनोद




एका मंत्र्याच्या मुलाने आपल्या मित्राला सांगितले, अवर्षण आणि अतिवृष्टी यात जमीन अस्मानचा फरक आहे.

मित्राने विचारले, तो कसा? उत्तर मिळाले, अवर्षणात मझे डॅडी जीपने दौरा करतात तर अतिवृष्टीच्या वेळेस हेलिकॉप्टरने.

## संदेश

Sms karne mai hum Dab-
bang hai hum
dosto ko yaad karne mai
Ready hai hum
ab to pahchan lo kon he
hum
dosto ki duniya ka Boady-
gurd hai hum

## सुविचार




आनंदाचा गुणाकार करावा. दुःखाचा भागाकार करावा.

**– अज्ञात**

**संस्कृत सुभाषित**

**श्रेयः पुष्पफलं वृक्षाद्,दध्नः श्रेयो घृतंस्मृतम्। श्रेयस्तैलंच पिण्याकाच्छ्रेयान् धर्मस्तु मानुषात।। अर्थ** – वृक्षापासून फुले व फळे मिळावीत अशी अपेक्षा असते. दह्यापासून तूप मिळावे अशी अपेक्षा असते तर माणसाकडून धर्माचरणाची अपेक्षा असते.

## मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. उत्तराधिकारी
६. सुस्ती, कंटाळा
८. दोन रत्ने
१०. ज्ञानेश्वारांची प्रार्थना
१२. चिंतन
१३. निमग्न
१४. भूतांचा राजा
१६. हिंमत, धैर्य
१७. चहासाठी 'बशी'
१९. तऱ्हा
२१. संतोष, आनंद
२३. ठोक! हाण
२५. सैन्याचा मालपुरवठा
२७. माणूस
२९. चणचण, दुर्भिक्ष्य
३०. येणारा समय
३२. गंध
३३. सोने
३४. देव
३७. हरकत, बंदी
३८. जवळचे संबंध, दाट मैत्री
४०. श्रेष्ठ पुरुष
४१. पचविणारा
४३. मिठी
४५. पायात चप्पल न घालता
४७. पटकन
५०. काळाकुट्ट
५२. हिंदीत जन्म
५४. धमनी
५५. रामदासस्वामींचा जन्मदिवस
५८. माळ
५९. कणीदार
६१. वसन, वस्त्र
६३. पुरुष
६४. पत्रातील साष्टांग नमस्कार विनंती विशेष
६६. समाजातील प्रतिष्ठा
६७. नवरदेव
६९. हिंदीत बासरी
७०. युद्ध
७२. अत्यंत मऊ धाग्याचे कापड
७४. वाळूवर रेघा मारून भविष्य सांगण्याची विद्या
७६. जनावर वगैरे सांभाळणे
७७. पुण्याचा नागरिक
७८. सामान
८०. तोंडी लावण्याचा एक पदार्थ प्रकार
८३. म्हशीचे पिलू
८४. दक्ष
८५. चाफा

### उभे शब्द

१. उपयोग,२. एक पाताळ
३. आठवण
४. गुंड, मोठा भाऊ
५. विमानांची धावपट्टी (इंग्रजी)
६. नभ
७. अगदी सारखे
८. सन्मानाची रक्कम
९. बडबड, वटवट, त्रास
१०. धनुष्यबाण
१५. शक्ती, बळ
१८. अनुमती
२०. फणसाची एक जात
२१. वहीत मोकळी सोडलेली उभी जागा
२२. पळणे
२४. फायदा
२६. लोखंडी खांब
२८. उगीच
२९. लाकूड चिरण्याचे एक हत्यार
३१. विसराळू
३२. घाव, प्रहार
३५. श्वासोच्छ्वास
३६. हलकट
३९. चमक, मुरगळा
४१. जल
४२. प्रेतावरील वस्त्र
४४. पक्के आश्वासन
४५. लोकांस जेवावयास घालणे
४६. लिहिलेले वाचणे
४८. रेशीमाचे जाडसर कापड
४९. अजाणता
५०. कावळ्याचे ओरडणे
५१. दार
५२. वतनदार
५३. कॉलेज (मराठी)
५६. गव्हाची एक उत्कृष्ट जात
५७. व्रत
६०. उपयोगात आणणे
६२. माघारी येणे, तव्यावर उलटून भाजणे
६५. आजूबाजूला
६८. एकरुप
७१. घाण
७३. अर्धांगवायू
७५. हिंदीत घर
७७. परत
७८. मत्स्य
७९. अंगावरील बारीक केस
८१. सडक, मार्ग
८२. सहापट

### आडवे उत्तर

१.वारसदार ६.आळस ८.माणिकमोती ११.पसायदान १२.मनन १३.रत १४.वेताळ १६.धमक १७.कप १९.लकब २१.समाधान २३.मार २५.रसद २७.मानव २९.वानवा ३०.भविष्यकाळ ३२.वास ३३.कनक ३४.ईश्वर ३७.मना ३८.सलगी ४०.नरवर ४१.पाचक ४३.कव ४५.अनवाणी ४७.चटकन ५०.काळाभिन्न ५२.जनम ५४.नस ५५.दासनवमी ५८.हार ५९.रवाळ ६१.कापड ६३.नर ६४.सानविवि ६६.पत ६७.वर ६९.बन्सी ७०.समर ७२.तलमसुती ७४.रमल ७६.पाळणे ७७.पुणेकर ७८.माल ८०.कायरस ८३.वासरू ८४.सावधान ८५.चंपक

### उभे उत्तर

१.वापर २.रसातल ३.सय ४.दादा ५.रनवे ६.आभाळ ७.समसमान ८.मानधन ९.कटकट १०.तीरकमान १५.ताकद १८.परवानगी २०.बरका २१.समास २२.धावणे २४.लाभ २६.सळई २८.हकनाक २९.वाकस ३१.विसरभोळा ३२.वार ३५.वचन ३६.नीच ३९.लचक ४१.पाणी ४२.कफन ४४.वचन ४५.अन्नदान ४६.वाचन ४८.टसर ४९.नकळत ५०.कावकाव ५१.कवाड ५२.जमीनदार ५३.महाविद्यालय ५६.सरबती ५७.वसा ६०.वापरणे ६२.परतणे ६५.आसपास ६८.समरस ७१.मळ ७३.लकवा ७५.मकान ७७.पुन्हा ७८.मासा ७९.लव ८१.रस्ता ८२.सक



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### युवराज सिंगने काय केले... ? ईडीने विचारला जाब

नवी दिल्ली–माजी क्रिकेटपटू युवराज सिंग याला बेकायदेशीर बेटिंग ॲप १दइशीं प्रकरणात ईडीने समन्स बजावले आहे. युवराजला २३ सप्टेंबर रोजी दिल्लीच्या ईडी मुख्यालयात चौकशीसाठी हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यामुळे युवराजच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. ईडीने वन एक्स बेट या बेकायदेशीर बेटिंग ॲप प्रकरणात माजी क्रिकेटपटू रॉबिन उथप्पा , बॉलिवूड अभिनेता सोनू सूद यांनाही समन्स बजावले आहे. रॉबिनला २२ सप्टेंबर, युवराजला २३ सप्टेंबर, तर सोनू सूदला २४ सप्टेंबर रोजी ईडीच्या दिल्लीतील मुख्यालयात चौकशीसाठी हजर राहण्यास सांगितले आहे. याआधी क्रिकेटपटू शिखर धवन, सुरेश रैना, अभिनेत्री उर्वीशी रौतेला यांची बेटिंग ॲप प्रकरणात ईडीने चौकशी केली आहे.ईडीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, १दइशीं, फेअरप्ले, पॅरीमॅच आणि लोटस३६५ यासारख्या बंदी घातलेल्या बेटिंग प्लॅटफॉर्मशी असलेल्या प्रचारात्मक संबंधांच्या चौकशीचा भाग म्हणून क्रिकेटपटू आणि कलाकारांची चौकशी करण्यात आली आहे.

***

### टीम इंडियाला मिळाला नवा जर्सी स्पॉन्सर

दिल्ली–मागील महिन्यात केंद्र सरकारने रिअल–मनी गेमिंग प्लॅटफॉर्मवर बंदी घालण्याच्या निर्णयानंतर २०२३ पासून टीम इंडियाच्या जर्सीचा प्रमुख प्रायोजक असणाऱ्या ड्रीम ११ भोवती अनिश्चितता निर्माण झाली. परिणामी बीसीसीआयने ड्रीम ११ सोबत जर्सी स्पॉन्सरशिपचा करार संपुष्ठात आणून नव्या जर्सी स्पॉन्सरच्या शोधाला सुरुवात केली होती. टीम इंडियाची जर्सी स्पॉन्सर करण्यासाठी अनेक कंपन्यांनी बीसीसीआयकडे अर्ज केल्याच्या बातम्या होत्या. अखेर बीसीसीआयने टीम इंडियाचा नवा जर्सी स्पॉन्सर म्हणून अपोलो टायर्स ची निवड केली आहे. बीसीसीआयने अद्याप याबाबत अधिकृत माहिती जाहीर केली नसली तरी मीडिया रिपोर्ट्समधून याबाबतच्या बातम्या समोर आल्या आहेत. मीडिया रिपोर्ट्सनुसार आता अपोलो टायर्स हे टीम इंडियाचे नवे स्पॉन्सर असणार असून हा करार पुढील तीन वर्षासाठी असेल. यात टीम इंडियाचे जवळपास २१ आयसीसी सामने आणि १२१ द्विपक्षीय सामन्यात टीम इंडियाचे खेळाडू अपोलो टायर्स या नव्या स्पॉन्सरचं नाव असलेली जर्सी घालतील.

***

### सूर्या सेना पाकिस्तानची अजून लाज काढणार; सिक्रेट प्लॅन समोर

दिल्ली–रविवारी आशिया कप २०२५ मधील ग्रुप स्टेज सामन्यात टीम इंडियाने पाकिस्तानचा ७ विकेटने लाजिरवाणा पराभव केला. या सामन्यादरम्यान टीम इंडियाकडून पाकिस्तान खेळाडूंशी हस्तांदोलन करण्यात आलं नाही. सूर्यकुमार यादवच्या सेनेनं पाकिस्तानला इग्नोर केल्यामुळे पीसीबी आणि पाकिस्तानच्या खेळाडूंचा तिळपापड झाला आहे. त्यांनी आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेकडे मॅच रेफरी अँडी पायक्रॉफ्ट यांच्याविरुद्ध तक्रार दाखल केली आणि म्हटले की या वादादरम्यान सामनाधिकारी पाकिस्तान संघाशी योग्यरित्या वागले नाहीत. मात्र आयसीसीने ही तक्रार फेटाळून लावल्याचे सांगण्यात येत आहे. भारत पाकिस्तान सामन्यानंतर आता सूर्यकुमार यादवची सेना पुन्हा एकदा स्पर्धेत पाकिस्तानला अपमानित करण्याचा सीक्रेट प्लॅन करत आहेत. काय आहे टीम इंडियाचा प्लॅन? आशिया कप २०२५ मध्ये खेळणाऱ्या टीम इंडियाने पाकिस्तान खेळाडूंशी हात न मिळवल्यानंतर आता पाकिस्तानला अपमानित करण्याची अजून एक योजना आखल्याची माहिती मिळतेय.

***

### अफगाणिस्तान आणि बांगलादेश सुपर–४ फेरीच्या तिकिटासाठी भिडणार

अबुअधी–आशिया चषकाच्या पहिल्या सामन्यात हाँगकाँगवर ९४ धावांच्या मोठ्या फरकानं विजय मिळवणारा अफगाणिस्तान आता आपला दुसरा सामना बांगलादेशशी आज म्हणजेच १६ सप्टेंबर (मंगळवार) खेळणार आहे. अफगाणिस्तान आणि बांगलादेश यांच्यातील सामना अबुअधी येथील शेख झायेद स्टेडियमवर रात्री ८ वाजता खेळला जाईल. या सामन्यात रशीद खान अफगाण संघाचं नेतृत्व करेल तर लिटन दास बांगलादेशचा कर्णधार असेल. गट–बी मधील या दोन्ही संघांमध्ये अटीतटीचा सामना पाहायला मिळणार आहे.दोन्ही देशांचा हेड टू हेड रेकॉर्ड : टी–२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये बांगलादेश आणि अफगाणिस्तान यांच्यात आतापर्यंत एकूण १२ सामने खेळले गेले आहेत. या दरम्यान, बांगलादेशनं या १२ सामन्यांपैकी ५ सामने जिंकले आहेत. तर अफगाणिस्तान संघ ७ वेळा विजयी झाला आहे. या आकडेवारीनुसार, रशीद खानचा संघ लिटन दासच्या संघाविरुद्ध मजबूत दिसत आहे. अफगाणिस्ताननं गेल्या ५ सामन्यांपैकी फक्त १ सामना गमावला आहे. दुसरीकडे, बांगलादेशनं गेल्या ५ सामन्यांपैकी २ सामने गमावले आहेत.

# महिला क्रिकेटपटूंचा एमसीएकडून खास सन्मान!



मुंबई: मुंबई क्रिकेट असोसिएशनने (चउ–) महिला क्रिकेटपटूंना अनोख्या पद्धतीने गौरवण्याचा निर्णय घेतला आहे. मुंबईच्या महिला कर्णधारांचे छायाचित्र असलेली एक विशेष भिंत वांद्रे–कुर्ला संकुलातील (इघउ) एमसीएच्या शरद पवार इनडोअर क्रिकेट अकादमीमध्ये उभारण्यात आली आहे. मुंबई आणि भारतीय क्रिकेटच्या इतिहासात या महिलांनी दिलेल्या महत्त्वपूर्ण योगदानाचा सन्मान करणे हा यामागील उद्देश आहे.

महिला विश्वचषक ट्रॉफीच्या उपस्थितीत अनावरण

खउउ महिला क्रिकेट विश्वचषक २०२५ ट्रॉफी दौऱ्याच्या निमित्ताने मुंबईत ही विशेष भिंत तयार करण्यात आली. चउ– अध्यक्ष अजिंक्य नाईक, एपेक्स कौन्सिलचे सदस्य आणि मुंबईच्या अनेक आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत महिला क्रिकेटपटूंच्या उपस्थितीत या भिंतीचे अनावरण करण्यात आले. हा उपक्रम केवळ या महिलांचा गौरवच करत नाही, तर पुढील पिढीतील महिला क्रिकेटपटूंना प्रेरणा देण्याचेही काम करेल.

दिग्गज कर्णधार ते आजच्या स्टार्स

मुंबईचा महिला क्रिकेटमधील वारसा खूप मोठा आहे. १९७८ मध्ये भारताने पहिल्यांदा महिला विश्वचषकात भाग घेतला, तेव्हा संघाचे नेतृत्व मुंबईच्याच डायना एडुलजी यांनी केले होते. हा गौरवशाली वारसा पुढे नेत, आगामी १३ व्या विश्वचषक स्पर्धेत जेमिमा रॉड्रिग्स भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे, तर सायली सतघरे राखीव खेळाडूंच्या यादीत आहे.या वेळी खेळाडू आणि अधिकाऱ्यांनी विश्वचषक ट्रॉफीसोबत फोटो काढले. १२ वर्षांनंतर भारतात परतलेल्या या जागतिक स्पर्धेबद्दलचा उत्साह यातून दिसून येत होता.

एमसीएची भूमिका–यावेळी बोलताना एमसीए अध्यक्ष अजिंक्य नाईक म्हणाले की, मुंबई नेहमीच भारतीय महिला क्रिकेटसाठी प्रतिभेची खाण राहिली आहे. डायना एडुलजींपासून ते जेमिमा रॉड्रिग्ससारख्या आजच्या स्टार्सपर्यंत, आमच्या खेळाडूंनी शहराचा मान अभिमानाने वाढवला आहे. ही विशेष भिंत महिला कर्णधारांना समर्पित असून ती पुढील पिढीला प्रेरणा देईल, असेही ते म्हणाले.एमसीएचे सचिव अभय हडप यांनी सांगितले की, ही भिंत केवळ एक श्रद्धांजली नाही, तर मुंबईच्या महिला क्रिकेटला आकार देणाऱ्या नेतृत्वाचा गौरव आहे. यामुळे पुढील पिढीला मोठी स्वप्ने पाहण्याची आणि शहरासाठी व देशासाठी अधिक उंची गाठण्याची प्रेरणा मिळेल अशी आम्हाला आशा आहे.

२०२५ महिला विश्वचषक

खउउ महिला क्रिकेट विश्वचषक २०२५ यावर्षी ३० सप्टेंबर ते २ नोव्हेंबर दरम्यान होणार आहे. या स्पर्धेतील सामने डी. वाय. पाटील स्टेडियम (नवी मुंबई), ए.सी.ए. स्टेडियम (गुवाहाटी), होळकर स्टेडियम (इंदूर), ए.सी.ए.–व्ही.डी.सी.ए. स्टेडियम (विशाखापट्टणम) आणि आर. प्रेमदासा स्टेडियम (कोलंबो, श्रीलंका) येथे खेळले जातील.

# नीरज चोप्रा अजिंक्यपद कायम राखण्याच्या उद्देशाने मैदानात उतरणार



**टोकियो :** भारताचा अव्वल भालाफेकपटू नीरज चोप्रा आपले विजेतेपद कायम राखण्याच्या उद्देशानेच जागतिक ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये उतरणार आहे. नीरज पात्रता फेरीपासून आपल्या मोहिमेची सुरुवात करणार आहे. या स्पर्धेत नीरजसाठी सर्वात मोठे आव्हान पाकिस्तानचा अर्शद नदीम आणि जर्मनीचा ज्युलियन वेबरचे असणार. नदीमने गेल्या वर्षी पॅरिस ऑलिंपिकमध्ये नीरजला मागे टाकत सुवर्णपदक जिंकले होते. तर वेबरने अलीकडेच डायमंड लीगचे विजेतेपद जिंकले होते.

जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत नीरजचे ध्येय सलग दुसऱ्यांदा सुवर्णपदक जिंकण्याचे असणार आहे. आणि अशी कामगिरी करणारा तिसरा भालाफेकपटू बनण्यावर त्याचे लक्ष्य असेल. टोकियो ऑलिंपिक सुवर्णपदक विजेत्या नीरजने २०२३ मध्ये बुडापेस्ट येथे झालेल्या जागतिक ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये सुवर्णपदक जिंकले होते. चेक प्रजासत्ताकचा दिग्गज आणि सध्या नीरजचे प्रशिक्षक जान झेलेंजी (१९९३, १९९५) आणि ग्रेनाडाचा अँडरसन पीटर्स (२०१९, २०२२) हे एकमेव खेळाडू आहेत ज्यांनी आतापर्यंत सलग दोन वेळा जागतिक अजिंक्यपद पटकावले आहे.२०२४ च्या पॅरिस ऑलिंपिकनंतर नीरज पहिल्यांदाच पाकिस्तानच्या नदीमशी सामना करणार आहे. त्याला फ्रान्सच्या राजधानीत दुसऱ्या क्रमांकावर राहिलेल्या कामगिरीचा बदला घेण्याची संधी मिळेल. नदीमने पॅरिसमध्ये ९२.९७ मीटरच्या शानदार फेकसह सुवर्णपदक जिंकले होते. तर नीरजचा त्या दिवशीचा सर्वोत्तम फेक ८९.४५ मीटर होता आणि त्याला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले होते. दोन्ही प्रतिस्पर्ध्यांना पात्रता फेरीत दोन वेगवेगळ्या गटात ठेवण्यात आले असल्याने नीरज आणि नदीम स्पर्धा करणार नाहीत.

# युएई विरुद्धच्या मॅचपूर्वी सलमान आगाने काय केले?

दुबई,–भारत आणि पाकिस्तान आशिया कपमध्ये १४ सप्टेंबरला आमने सामने आले होते. त्या सामन्यात भारताने पाकिस्तानला ७ विकेटने पराभूत केले होते. मात्र, भारतीय संघाच्या खेळाडूंनी पाकिस्तानच्या खेळाडूंसोबत हस्तांदोलन न केल्याने वाद निर्माण झाला होता. पाकिस्ताननं त्या विरोधात आशिया क्रिकेट परिषदेकडे तक्रार केली होती. तर, आयसीसीकडे सामनाधिकारी अँडी पायक्रॉफ्ट यांना हटवण्याची मागणी पाकिस्तान क्रिकेट बोर्डानं केली होती. मात्र, आयसीसीनं पीसीबीची मागणी फेटाळून लावली होती. यामुळं पाकिस्तान क्रिकेट बोर्डाला मोठा धक्का बसला होता. भारताविरुद्ध झालेल्या पराभवातून पाकिस्तानचा संघ अद्याप सावरलेला नाही. पाकिस्तानचा कॅप्टन सलमान आगा यानं मोठा निर्णय घेतला. संयुक्त अरब अमिरात विरुद्धच्या मॅचपूर्वीच्या परिषदेला उपस्थित राहणं सलमान आगानं टाळलं आहे. संयुक्त अरब अमिरात आणि पाकिस्तान उद्या आमने सामने येणार आहेत. त्यापूर्वी पाकिस्तानचा कॅप्टन सलमान आगा याला पत्रकार परिषद घ्यायची होती. मात्र, कोणतंही कारण न देता रद्द करण्यात आली आहे. मिडिया रिपोर्टसनुसार पाकिस्तान टीम मॅचपूर्वी सराव करणार आहे. पाकिस्तानला सुपर ४ मध्ये पोहोचण्यासाठी संयुक्त अरब अमिरातला पराभूत करावे लागेल.

# अपोलो टायर्स टीम इंडियाचा नवीन स्पॉन्सर

## प्रत्येक सामन्यासाठी बीसीसीआयला देणार ४.५ कोटी रुपये




**नवी दिल्ली**–भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) भारतीय क्रिकेट संघासाठी नवीन जर्सी स्पॉन्सर म्हणून अपोलो टायर्सची निवड केली आहे. ड्रीम११ सोबतचा करार रद्द केल्यानंतर बीसीसीआय नवीन स्पॉन्सरच्या शोधात होते. अपोलो टायर्सने प्रत्येक सामन्यासाठी बीसीसीआयला ४.५ कोटी रुपये देण्याचा करार केला आहे. हा करार २०२७ पर्यत चालेल.

कराराचे मुख्य मुद्दे:

ड्रीम११ नंतरची संधी: ऑनलाइन गेमिंगवरील नवीन कायद्यामुळे ड्रीम११ ने आपला करार रद्द केला होता. यामुळे टीम इंडिया आशिया कप २०२५ मध्ये जर्सी स्पॉन्सरशिवाय मैदानात उतरली होती.

सर्वाधिक बोली: बीसीसीआयने २ सप्टेंबर रोजी जर्सी स्पॉन्सरशिपसाठी निविदा काढली होती. या प्रक्रियेत कॅन्वा आणि जेके टायर्ससारख्या कंपन्यांनीही भाग घेतला होता, परंतु अपोलो टायर्सने सर्वाधिक बोली लावून ही बाजी मारली.

अपोलो टायर्सचा हा करार ड्रीम११ च्या जुन्या करारापेक्षा अधिक फायदेशीर आहे. ड्रीम११ प्रति सामन्यासाठी ४ कोटी रुपये देत होती, तर अपोलो टायर्स ४.५ कोटी रुपये देईल.या करारामुळे अपोलो टायर्सला आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठी ओळख मिळेल. भारतीय क्रिकेट संघाची लोकप्रियता जगभरात असल्याने कंपनीच्या ब्रँड व्हॅल्यूमध्ये वाढ होण्याची अपेक्षा आहे.

# पाकिस्तानची झोंबली, बीसीसीआयकडून पहिली प्रतिक्रिया, नियम सांगितला!

नवी दिल्ली–आशिया चषकात १४ सप्टेंबर रोजी भारत आणि पाकिस्तान यांच्यात सामना खेळवण्यात आला. या सामन्यात भारताने पाकिस्तानवर ७ विकेट्सने एकतर्फी विजय मिळवला. या सामन्यात टीम इंडियाच्या खेळाडूंनी सामना संपल्यानंतर पाकिस्तानच्या खेळाडूंसोबत हस्तांदोलन केलं नाही. टीम इंडियाच्या खेळाडूंनी हस्तांदोलन न केल्यामुळे पाकिस्तान क्रिकेट बोर्डाची चांगलीच झोंबली आहे.

पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने थेट आयसीसीकडे तक्रार करत सामन्यातील मॅच रेफरी अँडी पायक्रॉफ्ट यांची हकालपट्टी करण्याची मागणी केली होती. मात्र पाकिस्तान बोर्डाची ही मागणी आयसीसीने फेटाळून लावली. टीम इंडियाच्या खेळाडूंनी हस्तांदोलन करण्यामध्ये अँडी पायक्रॉफ्ट यांची भूमिका मोठी नव्हती, असं आयसीसीनं म्हटलं आहे. या सगळ्यात आता बीसीसीआयच्या एका अधिकाऱ्यांनी देखील हस्तांदोलन प्रकरणावर प्रतिक्रिया दिली आहे.

हस्तांदोलन प्रकरणावर बीसीसीआयची पहिली प्रतिक्रिया–

बीसीसीआयच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, जर तुम्ही नियमावली वाचली तर, विरोधी संघासोबत हस्तांदोलन करण्याबाबत कोणताही नियम नाही. ही एक सद्भावनापूर्ण कृती आहे आणि एक प्रकारची परंपरा आहे. हस्तांदोलन करायलाच हवे, याबाबत कोणताही कायदा नाही, असं बीसीसीआयच्या अधिकाऱ्याने सांगितले.

काय सांगतो घ्ण्ण आणि अ्ण्ण चा नियम?





क्रिकेटच्या कोणत्याही नियमपुस्तिकेत सामना संपल्यानंतर हस्तांदोलन अनिवार्य आहे, असे लिहिलेले नाही. हस्तांदोलन हा कसलाही नियम नसून खेळभावनेचा (एज्दीूस्हेप्ज दष णीग्म्ज्ञ्ाू) भाग मानला जातो. त्यामुळे जवळजवळ प्रत्येक सामन्यानंतर दोन्ही संघाचे खेळाडू एकमेकांना भेटतात. हस्तांदोलन करण्याचा नियमच नाही, त्यामुळे टीम इंडियावर दंडाचा किंवा कारवाई प्रश्नच उद्भवत नाही. मात्र, जाणूनबुजून प्रतिस्पर्धी संघाशी हस्तांदोलन करण्यास नकार दिल्यास, त्याला खेळभावनेच्या विरुद्ध कृती मानले जाते.

भारत–पाकिस्तानचा सामना कसा राहिला? पाकिस्ताननं भारतासमोर १२८ धावांचं सोपं लक्ष्य ठेवलं होतं. भारतानं हे आव्हान १६ व्या षटकातच पार केलं आणि पाकिस्तानविरुद्ध दणदणीत विजय मिळवला. सलामीच्या अभिषेक शर्मानं अवघ्या १३ चेंडूत चार चौकार आणि २ षटकारांसह ३१ धावा फटकावल्या. पण शुभमन गिल १० धावांवर बाद झाला. त्यानंतर तिलक वर्मा आणि कर्णधार सूर्यकुमार यादवनं तिसऱ्या विकेटसाठी अर्धशतकी भागिदारी साकारली. सूर्यकुमारनं नाबाद ४७ तर तिलक वर्मानं ३१ धावा केल्या. त्याआधी कुलदीप यादव आणि अक्षर पटेलच्या फिरकीसमोर पाकिस्तानी फलंदाजांनी अक्षरश: गुडघे टेकले. पाकिस्तानला २० षटकात ९ बाद १२७ धावांचीच मजल मारता आली. कुलदीप यादव आणि अक्षर पटेल या फिरकी जोडगोळीनं अवघ्या ३६ धावात ५ फलंदाजांना माघारी धाडलं. तर जसप्रीत बुमरानं २ आणि हार्दिक पांड्या, वरुण चक्रवर्तीनं प्रत्येकी एक–एक विकेट घेतली. पाकिस्तानचा सलामीवीर साहिबजादा फरहाननं सर्वाधिक ४० धावा केल्या. त्यानंतर एकाही फलंदाजाला फारसा प्रभाव पाडता आला नाही.

# पाकिस्तानी क्रिकेटरने गरळ ओकली, कॅप्टन सूर्यासाठी वापरले अपशब्द



दिल्ली,–आशिया कप २०२५ मधील भारत विरुद्ध पाकिस्तान ग्रुप स्टेज सामन्यात टीम इंडियाने पाकिस्तानचा ७ विकेट आणि २५ बॉल राखून पराभव केला. झालेला लाजिरवाणा पराभव आणि भारताने पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर हस्तांदोलन न करून दिलेली वागणूक यामुळे पाकिस्तानचा तीळपापड झाला. या सामन्याला आता २ दिवस उलटले आहेत. मात्र तरी देखील पाकिस्तानचं रडगाणं मात्र सुरूच आहे. पाकिस्तानचा माजी क्रिकेटर मोहम्मद युसुफने भारताविरुद्ध गरळ ओकली असून सूर्यकुमार यादवविषयी अपशब्द वापरले आहेत. एवढंच नाही तर त्याने टीम इंडियावर चीटिंग केल्याचा आरोप सुद्धा केला.

टीम इंडियाने ७ विकेट राखून पाकिस्तानवर विजय मिळवला आणि सूर्यकुमार यादवने सायलेंट प्रोटेस्ट केलं आणि पाकिस्तान संघाशी हस्तांदोलन केलं नाही. टॉस दरम्यानही सूर्याने पाकिस्तानचा कर्णधार सलमान अली आगा याच्याकडे दुर्लक्ष केले. यानंतर पाकिस्तान संतापला आहे आणि त्याने आयसीसीकडे मॅच रेफरी अँडी पायक्रॉफ्ट यांना पॅनेलमधून काढून टाकण्याची मागणी केली आहे. वृत्तानुसार, आयसीसीने पाकिस्तान क्रिकेट बोर्डाची ही मागणी फेटाळून लावली आहे. आता मोहम्मद युसूफच्या विधानाने खळबळ उडाली आहे.

काय म्हणाला मोहम्मद युसूफ?

एका टीव्ही शो दरम्यान युसुफने सूर्यकुमार यादवला मसुवरकुमार यादवफ असं म्हटलं. त्याने सूर्यकुमारचा मसुवरफ म्हणजेच मडुक्करफ असा उल्लेख केला. यानंतर, त्यांनी टीम इंडियावर फसवणूक केल्याचा आरोप केला आणि म्हटले की, मटीम इंडिया ज्या पद्धतीने जिंकण्याचा प्रयत्न करत आहे त्याची त्यांना लाज वाटली पाहिजे. पंचांना सोबत आणणे किंवा पंचांना छळणे. ही एक मोठी गोष्ट आहे. जर तुम्ही त्यांच्या पंचांकडे पाहिले तर त्यांनी मोदींकडे बोट दिले असेल. जेव्हा आम्ही (पाकिस्तान) आऊट करायचो तेव्हा त्यांचे बोट नाही उगारले. म

ग्रुप ए सुपर ४ चे समीकरण :

रविवारी १४ सप्टेंबर रोजी भारताने पाकिस्तानवर ७ विकेटने जबरदस्त विजय मिळवला. ज्यामुळे आधी यूएई आणि नंतर पाकिस्तानवरील विजयामुळे त्यांची पॉईंट्स टेबलमधील जागा निश्चित झाली. ओमानवरील विजयामुळे यूएईने आशिया कपमधील आपलं आव्हान अजून कायम ठेवलं. आता पाकिस्तानच्या बरोबरीने त्यांचे दोन अंक झाले आहेत. सध्या पॉईंट्स टेबलमध्ये भारत ४ पॉईंट्सने नंबर १ वर तर पाकिस्तान २ पॉईंट्सने नंबर २ वरती तर यूएईचा संघ २ पॉईंट्सने नंबर ३ वर आहे. तर ओमानच्या खात्यात शुन्य पॉईंट्स आहेत. १७ डिसेंबर रोजी यूएई विरुद्ध पाकिस्तान सामना अत्यंत महत्वाचा असेल कारण या सामन्यात विजयी होणारा संघ ४ पॉईंट्स मिळवेल आणि भारतासोबत सुपर ४ मध्ये प्रवेश करेल. शुक्रवारी भारताचा सामना ओमान विरुद्ध होणार आहे, परंतु या सामन्याच्या निकालाचा कोणताही परिणाम सुपर ४ च्या क्वालीफिकेशनवर होणार नाही.



# मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने कलबुरगि-कोल्हापूर सुपरफास्ट एक्सप्रेसची ३ गौरवशाली वर्षे साजरी केली

**लातूर/प्रतिनिधी :** मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने १६ सप्टेंबर २०२२ रोजी उद्घाटन झाल्यापासून प्रवाशांना आराम, वेग आणि भक्तीने सेवा देणाऱ्या ट्रेन क्रमांक २२१५५/२२१५६ कलबुरगि-कोल्हापूर सुपरफास्ट एक्सप्रेसचा तिसरा वर्धापन दिन साजरा केला.

गेल्या तीन वर्षांपासून, ही सुपरफास्ट एक्सप्रेस केवळ वाहतुकीचे साधन म्हणून उभी राहिली नाही. तर ती एक पवित्र रेल्वे बंधन बनली आहे, जी महाराष्ट्र आणि कर्नाटकमधील मंदिरे, परंपरा आणि समुदायांना अखंडपणे जोडते. या ट्रेनने केवळ यात्रेकरू आणि भाविकांना सुरक्षित, विश्वासार्ह आणि सोयीस्कर प्रवास पर्यायच दिला नाही तर दोन्ही राज्यांमधील सामाजिक आणि आध्यात्मिक संबंध मजबूत करून श्रद्धा, संस्कृती आणि एकता देखील आणली आहे.

या रेल्वे मार्गाला काही आध्यात्मिक आणि सांस्कृतिक स्थळांशी जोडलेला आहे:

- कलबुरगि  श्री शरण बसवेश्वर मंदिर,ख्वाजा बंदा नवाज दरगाह, बुद्ध विहार
- गाणगापुर  श्री दत्तात्रेय मंदिर
- अक्कलकोट  श्री स्वामी समर्थ महाराज मंदिर
- सोलापूर  श्री सिद्धेश्वर मंदिर
- पंढरपूर  श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर
- कोल्हापूर  श्री महालक्ष्मी मंदिर

कलबुरगि  कोल्हापूर सुपरफास्ट एक्सप्रेस ही भारतीय रेल्वे राष्ट्र उभारणी, सांस्कृतिक एकात्मता आणि प्रवाशांच्या सोयीसाठी कशी महत्त्वाची भूमिका बजावत आहे याचे एक ज्वलंत उदाहरण आहे.

या ट्रेनला ३ यशस्वी वर्षे पूर्ण होत असताना, सोलापूर विभाग प्रवाशांचे, भाविकांचे आणि समुदायांचे या रेल्वे सेवेला भक्ती, संस्कृती आणि एकतेचे खरे प्रतीक बनवण्यात अढळ विश्वास आणि पाठिंब्याबद्दल आभार मानतो. सोलापूर विभाग ज्या लोकांच्या समृद्ध वारसा, परंपरा आणि आकांक्षा साजरे करत सेवा प्रदान करण्यासाठी वचनबद्ध आहे.

# लातुरात अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे दोन दिवसीय राष्ट्रीय अधिवेशन : खंडापूरकर



**लातूर/प्रतिनिधी :** लातुरात दि. १७ व १८ सप्टेंबर २०२५ रोजी अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे दोन दिवसीय राष्ट्रीय अधिवेशन आयोजित करण्यात आल्याची माहिती समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर ( बाबा ) यांनी दिली.

अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती एवम ब्रीक्स मानव अधिकार मिशन च्या वतीने १७ आणि १८ सप्टेंबर २०२५ रोजी लातूर येथे मराठवाडा मुक्तिसंग्राम सोहळा आणि राष्ट्रीय अधिवेशन आयोजित करण्यात आले आहे. या अधिवेशनात अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे भारतातील पदाधिकारी उपस्थित रहाणार आहेत.

अधिवेशनात स्वातंत्र्य सैनिकांचा सन्मान, विरपत्नी, विरमातांचा सन्मान होणार आहे. तसेच ज्यांनी संघटना वाढीसाठी मोर्चे - आंदोलने केले, मेळावे, अभ्यास शिबीरे घेतली, संघटनात्मक बांधणीवर कार्य केले अशा पदाधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात येणार आहे. तरी अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती एवम ब्रीक्स मानव अधिकार मिशनच्या भारत देशातील सर्व पदाधिकाऱ्यांनी १७ व १८ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजेपर्यंत लातूर शहरातील बार्शी रोड, पीव्हीआर टॉकिज जवळ प्रणवश्री मंगल कार्यालयात उपस्थित रहावे असे आवाहन अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर बाबा यांनी केले आहे.

# दयानंद विज्ञान महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय सूक्ष्मजीव दिनानिमित्त पोस्टर प्रेझेन्टेशनचे आयोजन



**लातूर/प्रतिनिधी :** दि.१५ सप्टेंबर २०२५ रोजी दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या सूक्ष्मजीवशास्त्र विभागातर्फे आंतरराष्ट्रीय सूक्ष्मजीव दिनानिमित्त पोस्टर प्रेझेंन्टेशनचे आयोजन करण्यात आले.या स्पर्धे चे उद्घाटन महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.एस.एस.बेल्लाळे यांच्या हस्ते करण्यात आले.तसेच प्रमुख पाहुणे म्हणून आयक्यूएसी समन्वयक डॉ.जे.ए.अंगुलवार उपस्थित होते आणि प्रा.डॉ.ए.एन. चौगुले व प्रा.डॉ.व्ही.चौधरी यांची विशेष उपस्थिती लाभली. उद्घाटनानंतर लगेचच विद्यार्थ्यांच्या पोस्टरला भेट देताना प्राचार्यांनी त्यांचे सादरीकरण ऐकून विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे कौतुक केले व त्यांना शुभेच्छा दिल्या.

''मायक्रोब्स फ्रेण्डस,फोज ॲण्ड एव्हरीडे हिरोज'' हा पोस्टर सादरीकरणाचा विषय असून या स्पर्धेसाठी ३५ पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी उस्फूर्तपणे सहभाग नोंदवला.या स्पर्धेच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमधील विषयाचे ज्ञान,कला आणि सादरीकरण शैली यांचा उत्तम समन्वय बघायला मिळाला.या स्पर्धेचे समन्वयक म्हणून प्रा.डॉ.दीप्ती ढेरे यांनी काम पाहिले तसेच डॉ.आर.व्ही.सोळूंके, डॉ. वाय. पी. सारणीकर यांनी पोस्टर परीक्षणाची महत्त्वाची भूमिका पार पाडली.या स्पर्धेच्या आयोजनासाठी विभागप्रमुख डॉ.आर.ए.मोरे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.तसेच, विभागातील प्रा.डॉ.एम.ए.करळे, पदव्युत्तर समन्वयक प्रा.शितल पाटील,प्रा.शैलजा धुतेकर,प्रा.टेकाळे,प्रा. इंगळे व प्रा.मालू यांचे मोलाचे सहकार्य लाभले.विभागातील शिक्षकेत्तर कर्मचारी संतोष सूर्यवंशी,मदने, माधव सूर्यवंशी,पाटोळे यांचे विशेष साहाय्य लाभले.या स्पर्धेचा निकाल लवकरच जाहीर करण्यात येणार असून विभागाच्या आगामी कार्यक्रमामध्ये बक्षीस

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते अमलनेर (भां) बीड नवीन रेल्वेमार्गीकेचे उद्घाटन व बीड ते अहिल्यानगर पहिल्या गाडीला हिरवा झेंडा दाखविण्यात येणार

**मुंबई/प्रतिनिधी :** श्री. देवेंद्र फडणवीस, माननीय मुख्यमंत्री आणि श्री. अजित पवार, मा. उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री, बीड यांच्या हस्ते अमलनेर(भां) बीड नवीन रेल्वेमार्गीकेचे उद्घाटन व बीड ते अहिल्यानगर पहिल्या गाडीला हिरवा झेंडा दाखविण्यात येणार असून, दिनांक १७.०९.२०२५ रोजी विविध मान्यवरांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडणार आहे.

श्री. देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य आणि श्री. अजित पवार, मा. उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री, बीड यांच्या हस्ते अंमळनेर(भां) बीड नवीन रेल्वेमार्गीकेचे उद्घाटन तसेच बीड ते अहिल्यानगर या शुभारंभ गाडीला हिरवा झेंडा दाखविण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला सौ. पंकजा मुंडे, मा. मंत्री पर्यावरण व हवामान बदल तसेच पशुसंवर्धन आणि विविध मान्यवर उपस्थित राहणार असून, हा कार्यक्रम दिनांक १७.०९.२०२५ रोजी बीड रेल्वे स्थानकावर पार पडणार आहे. हा कार्यक्रम मराठवाडा मुक्ती संग्राम दिनासोबत साजरा होणार आहे. हा दिवस १७ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबादच्या निजामावर भारतीय सैन्याने मिळवलेल्या विजयाची आठवण करून देतो. या विजयामुळेच मराठवाड्याचा भारतीय संघराज्यात समावेश झाला होता.

**पार्श्वभूमी:**

६७.७८ कि.मी. लांबीचा आमलनेर(भां) बीड नवीन ब्रॉडगेज रेल्वेमार्ग ही २६१.२५ कि.मी. लांबीच्या अहिल्यानगर बीड परळी वैजनाथ नवीन ब्रॉडगेज रेल्वेमार्गीका प्रकल्पाचा एक भाग आहे.

अहिल्यानगर अंमळनेर(भां) या ९९.०३ कि.मी. लांबीच्या विभागाचे उद्धाटन आधीच झाले असून या विभागावर नियमित गाड्यांची सेवा सुरू आहे.

६७.७८ कि.मी. लांबीच्या अंमळनेर (भां) बीड या नवीन रेल्वेमार्गीकेच्या उद्धाटनाचे काम अतिशय आव्हानात्मक ठरले. या विभागात १५ मोठे पूल, ९० लहान पूल, १५ रोड ओव्हर ब्रिज, ३१ रोड अंडर ब्रिज तसेच ५ स्थानकांचे बांधकाम करण्यात आले आहे.

या प्रकल्पाचा खर्च भारतीय रेल्वे व महाराष्ट्र शासन यांच्यामध्ये ५०:५० टक्के वाटा या तत्त्वावर करण्यात येत आहे.

**फायदे:**

या विभागावर रेल्वे सेवा सुरू झाल्यामुळे मराठवाडा प्रदेशातील आतापर्यंत रेल्वेसेवेपासून वंचित राहिलेल्या भागांना तसेच दुर्गम भागांना रेल्वे संपर्क उपलब्ध होणार आहे.

यामुळे मराठवाडा प्रदेशाचा महाराष्ट्राच्या इतर भागांशी संपर्क साधला जाईल आणि विकासाच्या अमर्याद संधी निर्माण होतील.



यामुळे महाराष्ट्रातील मराठवाडा प्रदेशातील पारंपरिक दुष्काळग्रस्त भागांचा सामाजिक-आर्थिक आणि औद्योगिक विकास साधण्यातही मदत होईल.

बीड ते अहिल्यानगर या गाडीला हिरवा झेंडा दाखविण्यात आल्याने (सध्या अंमळनेर भां ते अहिल्यानगर या दरम्यान असलेल्या) या विभागावर रेल्वे सेवांची सुरुवात होणार आहे.

यामुळे या विभागातील बीड, राजुरी(नवगण), रायमोहा, विघनवाडी, जाटनांदूर आणि अंमळनेर(भां) या स्थानकांशी संपर्क सुधारेल आणि त्या भागांचा विकास साधला जाईल.

या विस्तारित गाडी सेवा विद्यार्थ्यांना, व्यापाऱ्यांना आणि दैनंदिन प्रवाशांना परवडणारी आणि पर्यावरणपूरक प्रवासाची सोय उपलब्ध करून देण्यात मदत करेल.

अहिल्यानगर आणि बीड हे दोन्ही जिल्हे वेगाने विकसित होत आहेत. येथे फक्त कृषी उत्पादनांपुरतेच मर्यादित न राहता अनेक लहान व मध्यम उद्योगही आहेत. तसेच, हे जिल्हे त्यांच्या ऐतिहासिक आणि धार्मिक प्रसिद्धीसाठीही ओळखले जातात.

अहिल्यानगर जिल्हा त्याच्या कृषी उत्पादनांसाठी प्रसिद्ध आहे. या जिल्ह्यातील प्रसिद्ध साईबाबा मंदिर आणि शनी शिंगणापूर मंदिर ही प्रमुख तीर्थस्थळे असून दरवर्षी लाखो भाविक येथे दर्शनासाठी येतात. याशिवाय भंडारदरा धरण, कळसुबाई शिखर, रंधा धबधबा, रेहेकुरी काळवीट अभयारण्य आणि इतर पर्यटनस्थळे ही येथे महत्त्वाची आकर्षणे आहेत.

महाराष्ट्रातील मराठवाडा भागातील बीड जिल्ह्याला समृद्ध इतिहास आणि धार्मिक महत्त्व आहे. १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेले परळी येथील प्रसिद्ध वैजनाथ ज्योतिर्लिंग हे येथे असून दरवर्षी लाखो भाविक येथे दर्शनासाठी येतात. याशिवाय या जिल्ह्यात इतर धार्मिक महत्त्वाची ठिकाणेही आहेत.

अहिल्यानगर बीड विभागाचे उद्घाटन, हे अहिल्यानगर बीड परळी वैजनाथ नवीन ब्रॉडगेज रेल्वेमार्गीका प्रकल्पाचे एक महत्वाचे पायरी ठरले आहे, ज्यामध्ये अनेक भौगोलिक आणि लॉजिस्टिक अडचणींवर मात केली गेली, आणि हे मध्य रेल्वेसाठी एक महत्वाची उपलब्धी ठरले आहे. मध्य रेल्वे रेल्वेचे जाळे विस्तारित करण्यास आणि समावेशक विकास व प्रादेशिक उन्नतीसाठी अंतिम टप्प्यापर्यंतचा संपर्क सुधारण्यास कटिबद्ध राहील.

# दयानंद विज्ञानमध्ये आयआयटी मुंबई येथील तज्ज्ञांचे मार्गदर्शन

**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान महाविद्यालय व आयआयटी,मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१५ सप्टेंबर २०२५ रोजी गेट- जॅम २०२६ परीक्षा मार्गदर्शनपर व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते.या व्याख्यान कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे होते.याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून गेट-जॅम अँम्बेसेडर आयआयटी,मुंबई येथील प्रियंका तलवार व कुणाल शर्मा,आयक्यूएसी समन्वयक डॉ.जमन अंगुलवार,कार्यक्रम समन्वयक डॉ.रवींद्र शिंदे,डॉ.चंद्रशेखर स्वामी,स्पर्धा परीक्षा कक्ष प्रमुख डॉ. गजानन बने,प्रा.शिवाजी आळणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे प्रियंका तलवार व कुणाल शर्मा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना गेट- जॅम परीक्षेचे महत्त्व,परीक्षा तयारीसाठी आवश्यक धोरणे व वेळेचे व्यवस्थापन,उच्च शिक्षण व संशोधनातील संधी आणि विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील करिअरच्या वाटा याविषयी सविस्तर असे मार्गदर्शन केले.

महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे यांनी गेट-जॅम परीक्षेमुळे उपलब्ध होणाऱ्या शैक्षणिक व व्यावसायिक संधीबद्दल मार्गदर्शन केले तसेच गेट - जॅम परीक्षेची माहिती देणे,अभ्यास धोरणे स्पष्ट करणे व उच्च शिक्षण,संशोधन व करिअरच्या संधीचे मार्गदर्शन करणे या उद्देशातून हा मार्गदर्शनपर व्याख्यान कार्यक्रम आयोजित करण्यात आला,असेही त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकातून डॉ.रवींद्र शिंदे यांनी कार्यक्रमाचे उद्दिष्ट व महत्त्व अधोरेखित केले तर आभार प्रा.स्वरूप गावकरे यांनी मानले.सूत्रसंचालन जाई दगडे व अथर्व याने संयुक्तरित्या केले.यावेळी विद्यार्थ्यांनी प्रश्नोत्तर



सत्रात सक्रिय सहभाग घेतला व आपल्या शंकांचे निरसन करून घेतले. हा कार्यक्रम अत्यंत यशस्वी ठरला व विद्यार्थ्यांना गेट- जॅमसारख्या राष्ट्रीय परीक्षाद्वारे उच्च शिक्षण व संशोधन क्षेत्रात पुढे जाण्याची निश्चितच प्रेरणा मिळाली.याप्रसंगी रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ.युवराज सारणीकर,औद्योगिक रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. आण्णाराव चौगुले,आयआयसी निमंत्रक डॉ.श्रेयस माहुरकर,डॉ.नाथराव केदार,डॉ.नंदिनी कोरडे,प्रा.राहुल जाधव यांच्यासह महाविद्यालयातील इतर प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी आणि पदवी व पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# चन्नबसवेश्वर फार्मसी महाविद्यालयास सलग पंधरा वर्षापासून महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाचा Excellent चा दर्जा कायम

लातूर:- येथील पंचाक्षरी शिवाचार्य ट्रस्ट द्वारा संचालित चन्नबसवेश्र्वर फार्मसी पॉलिटेक्निक महाविद्यालयात राबविण्यात येत असलेल्या डि.फार्मसी अभ्यासक्रमास महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या वर्ष २०२४-२०२५ च्या बाह्य संस्था अवेक्षणा मध्ये (External Institute Monitoring) Excellent दर्जा प्राप्त झाला आहे.

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई हि महाराष्ट्र राज्यातील सर्व तंत्रशिक्षण संस्था जसे पॉलीटेकनिक डी. फार्मसी, हॉटेल मॅनेजमेंट, प्रिंटिंग टेक्नॉलजी इ. संलग्नता देणारी व या संस्थांमध्ये शिकत असलेल्या विध्यार्थ्यांसाठी परिक्षा आयोजित करणारी संस्था असून सन २००२ मध्ये या संस्थेस स्वायत्त दर्जा प्राप्त झाला आहे. स्वायत्त दर्जा प्राप्त झाल्यानंतर तंत्र शिक्षण मंडळाने राज्यातील समस्त तंत्र शिक्षण राबवण्याऱ्या संस्थांसाठी अनेक विविध उपक्रम हाती घेतले आहे. त्यामध्ये संस्थ्यांचा दर्जा ठरवण्यासाठी दरवर्षी बाह्य संस्था अवेक्षणाचे आयोजन करण्यात येते.

या अवेक्षणाच्या माध्यमातून तंत्र शिक्षणातील महाविद्यालयाची तज्ञ व्यक्तीच्या समितीकडुन तपासणी करण्यात येऊन त्यात महाविद्यालयाचे शैक्षणिक कामकाज, विद्यार्थांचे निकाल, उपलब्ध सोई सुविधा, विद्यार्थांचे प्लेसमेंट, कामकाजाची गुणवत्ता, महाविद्यालयातील सामाजिक कामकाज असा अनेक बाबांची पडताळणी घेऊन शेवटी तंत्रशिक्षण मंडळाच्या मुख्यालय स्तरावर या सर्व बाबींची चाचणी घेऊन महाविद्यालयास अंतिम दर्जा प्रदान करण्यात येतो. सदर तपासणी आणि त्यासाठी वापरण्यात येत असलेले मापदंड हे राष्ट्रीय पातळीवर National Board of Accreditation साठी वापरण्यात येणाऱ्या मापदंडा च्या दर्जाचे असल्यामुळे यास एक वेगळे महत्व प्राप्त आहे.

सन २०२४-२०२५ या वर्षातील शैक्षणिक अवेक्षण चन्नबसवेश्र्वर फार्मसी महाविद्यालयात तज्ञ व्यक्तीच्या समिती कडून मार्च महिन्यात करण्यात आले. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे यशस्वी निकाल, काटेकोर पणे चालणारे शैक्षणिक कामकाज महाविद्यालयातर्फे सामोहिक तंत्र निकेतन योजनेच्या माध्यमातून हाती घेतलेले सामाजिक उपक्रम, महाविद्यालयास प्राप्त झालेला ISO 9001 दर्जा, विभागीय उत्तरपत्रिका तपासणी केंद्र कामकाज, प्रवेश निश्चिती केंद्राचे कामकाज आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासासाठी हाती घेतलेले नवनवीन उपक्रम या सर्व बाबीच्या आधारे या तज्ञ व्यक्तीकडून तपासणी होऊन मंडळास अहवाल सादर करण्यात आला आणि नुकतेच तंत्र शिक्षण मंडळाकडून महाविद्यालयास उत्कृष्ट (Excellent) दर्जा मिळाल्याचे पत्र संस्थेस प्राप्त झाले.

संपूर्ण महाराष्ट राज्यात हजारोंच्या संखेत असलेल्या तंत्रशिक्षणाच्या संस्थामधुन सन २०२४-२०२५ साठी उत्क्रुष्ट दर्जा प्राप्त केला असून अश्या काही बोटावर मोजता येणाऱ्या संस्था आहेत. एवढेच नव्हे तर संपूर्ण राज्यात मागील पंधरा वर्षापासून एकाच संस्थेस सातत्याने उत्कृष्ट (Excellent) दर्जा प्राप्त होण्याचे कदाचित एकमेव उदाहरण आसू शकते.

महाविद्यालयाच्या या यशा बद्दल या संस्थेचे सचिव श्री. भीमाशंकर देवणीकर, संस्थेचे विस्वस्थ श्री. विजयकुमार मठपती, श्री. सिद्धेश्वरअप्पा हलकुडे, डॉ. अशोक सांगवीकर, यांनी प्राचार्य डॉ. संजय थोंटे व प्रा. रवी राजूरकर, प्रा.भोसले पी. एच,प्रा.सुगावे बी.के प्रा. सुगावे आर. व्ही, प्रा.कौडेवार डी. आर, प्रा.कर्डिले गंगासागर, शिक्षकेत्तर कर्मचारी श्री. शिवहार विभूते, श्री. अमोल सोनकांबळे, श्री. उमाकांत गचाटे, श्री. प्रदीप रामेगावकर, श्री. ईश्वर डोंगरे, श्री. गणेश स्वामी यांचे या यशाबद्दल अभिनंदन व कौतुक केले.

# जागेवरच निवड संधी या मोहिमेअंतर्गत रोजगाराची संधी

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व मॉडेल करिअर सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पंडीत दीनदयाल उपाध्याय जागेवरच निवड संधी अर्थात प्लेसमेंट ड्राईव्हचे १८ सप्टेंबर, २०२५ रोजी सकाळी ११ वाजता लातूर येथील जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र येथे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमात नामांकित आस्थापना, उद्योजक सहभागी होणार आहेत. या आस्थापनेमध्ये दहावी, बारावी, कोणतीही पदवी, पदव्युत्तर पदवी, आय.टी.आय., डिप्लोमा, तसेच इतर शैक्षणिक पात्रतेच्या उमेदवारांना यामध्ये सहभागी होता येणार आहे.

इच्छुक उमेदवारांनी १८ सप्टेंबर, २०२५ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, शासकीय तंत्र प्रशाला केंद्र, जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालया समोर, लातूर येथे स्वखर्चाने मुलाखतीसाठी आवश्यक शैक्षणिक कागदपत्रे, स्वतःचा रिझ्युम, बायोडाटा, पासपोर्ट फोटो इत्यादीच्या पाच प्रतीसह उपस्थित रहावे, असे अवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त यांनी केले आहे.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

## मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त धारा १४४ लागू सार्वजनिक ठिकाणी जमावबंदीचे आदेश

धाराशिव, (जिमाका)- मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १४४(३) अन्वये जमावबंदीचे आदेश लागू करण्यात आले आहेत.

मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाचा ७७ वा वर्धापन दिन समारंभ दिनांक १७ सप्टेंबर २०२५ रोजी साजरा होणार आहे.या दिवशी विविध पक्ष,संघटना व इतर नागरिकांकडून मोर्चे,सभा, धरणे,उपोषणे,आंदोलने,रस्ता रोको इत्यादी आंदोलनात्मक कार्यक्रम होण्याची शक्यता असल्याने जिल्हा प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून हा निर्णय घेतला आहे.

मुख्य ध्वजारोहण समारंभाचे आयोजन जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात करण्यात आले असून,या ठिकाणी पालकमंत्री यांच्या हस्ते ध्वजारोहण होणार आहे. त्याचप्रमाणे शिंगोली सर्किट हाऊस, जिल्हाधिकारी कार्यालय,छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसर इत्यादी ठिकाणीही जमावबंदी आदेश लागू राहील.

या आदेशानुसार १६ सप्टेंबर २०२५ रोजी रात्री १२ वाजेपासून ते १७ सप्टेंबर २०२५ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत पाच किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्तींना एकत्र येणे,मोर्चा,धरणे, आंदोलन,रस्ता रोको,सभा घेणे प्रतिबंधित राहील.

उपविभागीय दंडाधिकारी श्री.ओकार देशमुख यांनी दिलेल्या आदेशानुसार, सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यासाठी व कोणत्याही प्रकारचा गोंधळ टाळण्यासाठी नागरिकांनी प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## जिल्ह्यात शिक्षण क्षेत्रात मोठी मजल: शाळा,स्वच्छतागृहे, संगणक व शिष्यवृत्ती योजनांचा लाभ हजारो विद्यार्थ्यांपर्यंत

धाराशिव (प्रतिनिधी) धाराशिव जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभाग (प्राथमिक) तर्फे सन २०२४-२५ मध्ये शिक्षण क्षेत्रात अनेक महत्वाचे उपक्रम राबविण्यात आले आहेत.

जिल्हा वार्षिक योजनेतून एकूण ३० शाळांमध्ये ३३ नवीन वर्गखोल्यांच्या बांधकामासाठी ४.३३ कोटी रुपये निधी मंजूर झाला आहे.तसेच ९२ शाळांमध्ये नवीन स्वच्छतागृह बांधकामासाठी ४.९८ कोटी रुपये निधी देण्यात आला असून, विद्यार्थ्यांना स्वच्छ व सुरक्षित शैक्षणिक वातावरण उपलब्ध होणार आहे.जिल्हा परिषदेच्या ८८ शाळांना १६९ संगणक संचांचा पुरवठा करून डिजिटल शिक्षणाला गती मिळाली आहे.

शिक्षणाचा हक्क कायद्याअंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये धाराशिव जिल्ह्यातील ११३ इंग्रजी माध्यम शाळांमधून ७९४ वंचित व दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना २५ टक्के मोफत प्रवेश देण्यात आला असून,त्यांची शैक्षणिक फी शासनामार्फत दिली जात आहे.

स्पर्धा परीक्षा एक चळवळ या उपक्रमांतर्गत इयत्ता ५ वी व ८ वी शिष्यवृत्ती तसेच नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षांसाठी विशेष मार्गदर्शन वर्ग व सराव परीक्षा घेण्यात आल्या.

या उपक्रमामुळे चालू शैक्षणिक वर्षात ५ वी शिष्यवृत्तीमध्ये पात्रतेचे प्रमाण ४ टक्क्यांनी व ८ वी शिष्यवृत्तीमध्ये ६ टक्क्यांनी वाढ झाली आहे. परिणामी,जिल्ह्यातील ५ वीचे २७० व ८ वीचे २५६ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक झाले आहेत. विद्यार्थ्यांच्या इंग्रजी भाषेच्या कौशल्य वृद्धीसाठी स्पेल बी उपक्रम राबविण्यात आला असून,जिल्हा परिषदेच्या १०८१ शाळांमधील इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंतचे सर्व विद्यार्थी यात सहभागी झाले.शाळा,बीट, तालुका व जिल्हास्तरावर घेतलेल्या या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांच्या वाचन, लेखन व शुद्ध उच्चारात लक्षणीय सुधारणा झाली आहे.

याशिवाय,सुवर्ण महोत्सवी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या २९१० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळाल्यामुळे शैक्षणिक प्रगतीचा मार्ग अधिक सुकर झाला आहे.

या सर्व उपक्रमांमुळे धाराशिव जिल्ह्यातील शालेय शिक्षण अधिक गुणवत्तापूर्ण,स्पर्धात्मक आणि आधुनिक होत आहे.

## बालकांचे हक्क व बालविवाह प्रतिबंध जनजागृती कार्यक्रम

धाराशिव,दि.१६ सप्टेंबर (जिमाका) जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालयाच्या अधिनस्त बाल संरक्षण कक्ष,चाईल्ड हेल्पलाईन १०९८ व सखी वन स्टॉप सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने धाराशिव येथील के.टी.पाटील नर्सिंग महाविद्यालय, इंदिरा गांधी नर्सिंग इन्स्टिट्यूट आणि व्यंकटेश महाजन विद्यालय येथे बालकांचे हक्क व बालविवाह प्रतिबंध या विषयावर जनजागृती कार्यक्रम नुकताच आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना बालहक्कांविषयी जागरूक करून त्यांचे रक्षण करण्याचे महत्त्व स्पष्ट करण्यात आले.तसेच अल्पवयीन मुलींचे शिक्षण,आरोग्य आणि सुरक्षित भविष्य सुनिश्चित करण्यासाठी बालविवाह प्रतिबंधाविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

## १२०० मिटर तांब्याची तारेची अज्ञाताने केली चोरी

नळदुर्ग (प्रतिनिधी)-पोलीस ठाणे अंतर्गत दि.१०.०९.२०२५ रोजी किलज शिवारातील शेत गट नं ५६/३, ७५ मधील पुरमपुज्य सोलार एनर्जी प्रा.लि. किलज ब्लॉक नं १ मधील इनर्वटर८९, ९०, ९१, ९२, ९३ तसेच ब्लॉक नं ०२ चे इनर्वटर १०२, १०३, ११३, ११४, ११५, ११६ असे ११ इनर्वटर ला बसवलेली १२०० मिटर तांब्याची तार एकुण ५७,८०४ किंमतीची अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-तरणीश सीताराम पांचाल,वय ३९ वर्षे, रा. ५ एफ ५आर के पुरम ता. जि. कोटा राज्य राजस्थान ह.मु. पुरमपुज्य सोलार एनर्जी प्रा.लि. किलज ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.१४.०९.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन नळदुर्ग पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## डिजिटल शेतीपासून शेतरस्त्यांपर्यंत जिल्ह्यात लोकाभिमुख सुशासनाच्या नव्या वाटा

धाराशिव (जिमाका)- जिल्ह्यातील शेतकरी व नागरिकांसाठी शासनाच्या विविध लोकाभिमुख योजनांची प्रभावी अंमलबजावणी होत असून डिजिटल शेतीपासून शेतरस्त्यांच्या सिमांकनापर्यंत नवे उपक्रम राबविण्यात येत आहेत.केंद्र शासनाच्या निर्देशानुसार डिजिटल क्रॉप सर्वे प्रकल्प राबविण्यात येत आहे. खरीप हंगाम २०२५ साठी शेतकऱ्यांच्या ई-पीक पाहणीसाठी DCS मोबाईल अॅप (व्हर्जन ४.०.०) उपलब्ध करून देण्यात आले असून नोंदणीची मुदत २० सप्टेंबरपर्यंत वाढविण्यात आली आहे. त्यानंतर २१ सप्टेंबर ते ४ नोव्हेंबर दरम्यान सहाय्यक स्तरावर पाहणी होणार आहे. यामुळे शेतकऱ्यांना कृषी पत्तपुरवठा, पीकविमा,दावे व नैसर्गिक आपत्तीतील नुकसानभरपाई तातडीने मिळू शकणार आहे.

शेतकरी बांधवांच्या सोयीसाठी ग्रामीण भागातील शेतरस्त्यांचे सिमांकन व क्रमांकिकरण करण्याचा ऐतिहासिक निर्णय शासनाने घेतला आहे.महसूल पंधरवड्यात पाणंद रस्तेविषयक मोहिम राबवून प्रत्येक रस्त्याची स्पष्ट नोंद महसूल अभिलेखात होणार आहे.यामुळे अतिक्रमण दूर होऊन वाहतुकीला गती मिळेल व शेतमाल बाजारपेठेत पोहोचण्यास सुलभता निर्माण होईल.

शासनाच्या डिजिटल उपक्रमांतर्गत AgriStack प्रकल्पामुळे प्रत्येक शेतकऱ्याला विशिष्ट शेतकरी ओळख क्रमांक (Farmer ID) मिळणार आहे.हा क्रमांक भविष्यातील सर्व कृषी योजना, अनुदाने आणि विमा लाभांसाठी महत्त्वाचा ठरेल.सध्या धाराशिव जिल्ह्यातील ४ लक्ष ७७ हजार ४४ शेतकऱ्यांपैकी ३ लक्ष ५१ हजार ६४० शेतकऱ्यांनी नोंदणी पूर्ण केलेली आहे. लोकाभिमुख प्रशासनासाठी विविध डॅशबोर्ड व डिजिटल पोर्टल्स कार्यान्वित करण्यात आले आहेत.यात Tuljal Chatbot, कल्पवृक्ष Smart-GR, कार्यसिद्धी पोर्टल, Single Window System आणि जीवनरेखा पोर्टल यांचा समावेश असून त्याद्वारे पारदर्शकता, जबाबदारी व कार्यक्षमता वाढत आहे.

जिल्ह्यात नवीन ५४० आपले सरकार सेवा केंद्रे सुरू करण्यासाठी अर्ज मागविण्यात आले आहेत.तसेच अनुकंपा भरतीसाठी १९ पात्र उमेदवारांची निवड झाली आहे. याशिवाय नागरिकांच्या अडी-अडचणी सोडविण्यासाठी जनता दरबार ही नाविन्यपूर्ण संकल्पना राबवली जात असून आठवड्यातील सोमवार,बुधवार व शुक्रवार या दिवशी नागरिकांना अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. शासनाचा उद्देश प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत सुलभ रस्ता व पारदर्शक प्रशासन हा आहे. आपण सर्वांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग घेऊन ग्रामीण विकासाच्या वाटचालीला नवी ऊर्जा द्यावी.

## जिल्ह्यात कृषी विकासाचा वेग विविध योजनांतून कोट्यवधींचे अनुदान शेतकऱ्यांपर्यंत

धाराशिव (जिमाका)- जिल्ह्यात शेतकरी बांधवांना केंद्र व राज्य शासनाच्या विविध कृषी योजनांचा मोठ्या प्रमाणावर लाभ मिळत असून अनुदान वितरण,विमा भरपाई,सिंचन,कृषी यांत्रिकीकरण,नैसर्गिक शेती,अन्नप्रक्रिया उद्योग व कृषी व्यवसाय या क्षेत्रांत महत्त्वपूर्ण यश मिळाले आहे,अशी माहिती जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांनी दिली.

**फलोत्पादन व सिंचन योजना :**

एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानातून २०२४-२५ मध्ये ३१६ लाभार्थ्यांना २ कोटी ९७ लक्ष व २०२५-२६ मध्ये १५ लाभार्थ्यांना रु. १४ लक्ष २० हजार रुपयांचे अनुदान वितरित करण्यात आले. प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेअंतर्गत २०२४-२५ मध्ये ६ हजार ८४३ शेतकऱ्यांना १७ कोटी ६२ लक्ष तर २०२५-२६ मध्ये १ हजार ९३ शेतकऱ्यांना २ कोटी ५५ लक्ष रुपयांचा लाभ मिळाला. मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेअंतर्गत वैयक्तिक शेततळ्यांसाठी १०४ लाभार्थ्यांना ६४ लाखांचे अनुदान देण्यात आले.

**कृषि यांत्रिकीकरण व विमा योजना :**

२०२४-२५ मध्ये ५३१ लाभार्थ्यांना ३ कोटी व २०२५-२६ मध्ये ३६९ लाभार्थ्यांना २ कोटी ३९ लक्ष रुपयांचे अनुदान वितरित झाले.प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत २०२४-२५ मध्ये ४ लक्ष ५८ हजार ४१७ अर्जदारांना २२० कोटी ९९ लक्ष रुपयांची भरपाई,तर काढणी पश्चात ७५ हजार ६७७ शेतकऱ्यांना ४८ कोटी ८४ लक्ष रुपयांची मदत मिळाली.खरीप २०२५-२६ मध्ये ४ लक्ष ९६ हजार १९ शेतकऱ्यांनी विमा हप्ता भरून ३ लक्ष ९६ हजार ४३५ हेक्टर क्षेत्र संरक्षित केले आहे.

शेतकरी सुरक्षा व फळबाग योजना :

गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा योजनेत १८२ वारसदारांना ३ कोटी ५८ कोटींचे अनुदान वितरित झाले.तर भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेअंतर्गत ४२३ शेतकऱ्यांना ४० लाखांचे अनुदान देण्यात आले.

**अन्नप्रक्रिया व शेतकरी उत्पन्न वाढ :**

प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेतून ४४९ उद्योगांना २४ कोटी ५९ लक्ष रुपयांना मंजुरी व ३५८ उद्योगांना २० कोटी ९ लक्ष रुपयांचे कर्ज मिळाले.यात दुग्धोत्पादन, कडधान्य व मसाले आधारित उद्योगांचा समावेश आहे.

**किसान सन्मान निधी :**

२०१९ ते २०२५ दरम्यान ४८ लक्ष ५१ हजार ४६० लाभार्थ्यांना ९६४ कोटी १२ लक्ष रुपयांचा लाभ मिळाला असून २० वा हप्ता २ लक्ष ३८ हजार ५७१ शेतकऱ्यांना ४७ कोटी ७२ लक्ष रुपयांचा वितरित झाला आहे.

**नैसर्गिक शेती व स्मार्ट प्रकल्प :**

डॉ.पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशनअंतर्गत ११० शेतकरी गट व ११ शेतकरी उत्पादक कंपन्यांनी जैविक निविष्ठा केंद्रे स्थापन केली आहेत.त्यामुळे ५ हजार ५०० शेतकरी ५५०० हेक्टर क्षेत्र सेंद्रीय शेतीअंतर्गत आणतील. तसेच १२ शेतबांधावरील प्रयोगशाळांसाठी ७ लाखांचे अनुदान देण्यात आले.

मा.बाळासाहेब ठाकरे स्मार्ट प्रकल्पांतर्गत ४६ शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या प्रकल्पांना ८० कोटींची अंतिम मंजुरी मिळाली असून २३ प्रकल्प सुरु आणि ५ पूर्ण झाले आहेत.गोदामांच्या माध्यमातून ३० हजार ४३२ मेट्रिक टन साठवण क्षमता निर्माण होत आहे.

**नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर :**

जिल्ह्यात सोयाबीन पिकावर कृत्रिम बुद्धिमत्ता (-ख) तंत्रज्ञानाचा प्रयोग हाती घेण्यात आला आहे.तसेच आयआयटी मुंबईच्या माध्यमातून नकाशे,डॅशबोर्ड, सल्ला व उत्पादक कंपन्यांचा अभ्यास यांसारखे नाविन्यपूर्ण प्रकल्प सुरू आहेत.

या सर्व योजनांमुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढून कृषी विकासाला गती मिळणार असून धाराशिव जिल्हा कृषी क्षेत्रात राज्याच्या आघाडीवर पोहोचण्याच्या मार्गावर असल्याचे कृषी विभागाने सांगितले.

## पोलिसांची जुगार विरोधी कारवाई

अंबी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत जुगार विरोधी कारवाई दरम्यान अंबी पोलीसांनी दि.१४.०९.२०२५ रोजी अंबी पो ठाणे हद्दीत शिवाजी शंकर डुकुहे यांचे राहते घरासमोरील ओट्यावर मलकापूर गावात छापा टाकला. यावेळी नितीन, कृष्ण, राजेंद्र, शिवाजी, महादेव सर्व रा. मलकापूर ता. परंडा जि. धाराशिव हे शिवाजी शंकर डुकुहे यांचे राहते घरासमोरील ओट्यावर मलकापूर गावात तिरट मटका जुगाराचे साहित्य एकुण १,८४० रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले अंबी पो. ठाणेच्या पथकास आढळले. यावरुन पोलीसांनी जुगार साहित्यासह रक्कम जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम- १२ (अ) अन्वये अंबी पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.


## लातूर समाचार उस्मानाबाद

बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क

9422472502
9175325708


## उस्मानाबाद शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

## धाराशिव जिल्ह्यात स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियान राबविण्यात येणार



धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- भारतीय महिलांचे आरोग्य सशक्त करणे, त्यांना आरोग्यविषयक जागरूकता निर्माण करून एक सक्षम, सशक्त आणि आत्मनिर्भर समाज घडवणे या उद्देशाने केंद्र शासनाने दि.१७/०९/२०२५ ते ०२/१०/२०२५ या कालावधी मध्ये देशभरामध्ये स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियान राबविण्याचे निश्चित केले असून धाराशिव जिल्ह्यामध्ये सदर अभियान दि.१७/०९/२०२५ ते ०२/१०/२०२५ या कालावधीमध्ये राबविण्यात येणार आहे.यामध्ये महिलांना खालील प्रमाणे आरोग्य सेवा देण्यात येणार आहेत.

**ग्रामीण व शहरी भागातील महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबीर.**

महिलांच्या स्तन व गर्भाशय कर्करोगाची प्राथमिक तपासणी

रक्त दाब व मधुमेहाची तपासणी.

रक्ताची हिमोग्लोबिन तपासणी.

माता व बाल आरोग्य सेवा

किशोर वयीन मुलींसाठी मासिक पाळी स्वच्छता व पोषण जनजागृती

जनजागृती आणि वर्तवणूक बदल संवाद

महिलांची एनसीडी, क्षयरोग तपासणी व निक्षय मित्र बनविण्यासाठी मोहीम राबविणे

**रक्तदान शिबिराचे आयोजन करणे**

महिलांसाठी आरोग्य शिबिरे आयोजित करण्यासाठी खाजगी क्षेत्रातील रुग्णालय सहभाग.

**सार्वजनिक आरोग्य विभागाची तयारी**

या अभियानाच्या अनुषंगाने आरोग्य विभाग धाराशिव यांचे मार्फत तयारी पूर्ण झालेली आहे यामध्ये मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.धाराशिव यांच्या मार्गदर्शनात ग्राम पंचायत विभाग, शिक्षण विभाग प्राथमिक व माध्यमिक, महिला व बालकल्याण विभाग यांच्यासह सर्व शिक्षक, अंगणवाडी सेविका, आशा, आरोग्य कर्मचारी यांचा सहभाग घेण्यात येणार आहे.जिल्ह्यातील सर्व आरोग्य उपकेंद्र, प्रा.आ.केंद्र, ग्रामीण व उपजिल्हा रुग्णालय, महिला रुग्णालय येथील अधिकारी व कर्मचारी यांना अभियाना बद्दल प्रशिक्षण देण्यात आलेले आहे.

जिल्ह्यात एकूण २५५ ऍंशिपीं केंद्र शासनाच्या पोर्टल वर तयार करण्यात आलेले आहेत. जिल्ह्यात अभियानाच्या दृष्टीने मुबलक औषध साठा उपलब्ध ठेवण्यात आलेला आहे. शासनाकडून प्राप्त प्रसिद्धी साहित्य व मार्गदर्शक सूचनानुसार जन जागृती करण्यात येत आहे.

सदर अभियानाचा उदघाटन सोहळा जिल्ह्याचे पालकमंत्री व सर्व लोकसभा , विधानसभा , विधान परिषद सदस्य यांच्या उपस्थित दि.१७.०९.२०२५ रोजी शासकीय महिला रुग्णालय धाराशिव येथे पार पडणार आहे .

सदर या अभियानामुळे महिलांना त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याविषयी प्रोस्ताहन मिळेल आणि गंभीर आजाराचे लवकर निदान होऊन योग्य वेळी उपचार सुरु करण्यास मदत होईल.

यामुळे स्वस्थ नारी सशक्त नारी हे उदिष्ट साध्य होण्यास मदत होणार आहे तरी अभियानामध्ये महिला व किशोरवयीन मुली यांनी मोठ्या प्रमाणात सहभागी होऊन आरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन मा. डॉ.मैनाक घोष, मुख्य कार्यकारी अधिकारी, धाराशिव, डॉ. एस. एल. हरिदास, जिल्हा आरोग्य अधिकारी, डॉ. धनंजय चाकूरकर जिल्हा शल्य चिकीस्तक, यांनी केले आहे.

हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२

Latur Samachar, Osmanabad Printed & Published by Jade Dayanand Shankarrao , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Osmanabad. Editor : Jade Dayanand Shankarrao Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649